# आजोबा व एक नातू...

कथा



आजोबा आणि नातू हे समिकरण फार जुनं आहे. 'जुनं ते सोनं' हे निश्चितच नातवास कळत असावं. आई वडीलांना कामाच्या व्यापामुळे कदाचित वेळ देता येत नसेल. पण नातवाचा वेळ आजोबासाठी व अजोबाचा वेळ नावासाठी नेहमीच राखीव असतो. जेव्हा वय जसं जसं झुकायला लागतं, तेव्हा अजोबाचं बाप म्हणून महत्त्व संपतं. अजोबा होऊन नातवासाठी उरलेलं अख्खं आयुष्य बागडत असतं. वय, मानपान व अहंकार सोडून अजोबा बालपण स्विकारत असतो. आजोबा आणि नातू हे मित्र बनून जातात. अजोबाची काठी, अजोबाचा चष्मा, अजोबाचा श्वास म्हणजे नातू असतो . फिरायला जायचं अजोबा सोबत. कामात अडथळा निर्माण करणारं मुल व निकामी झालेले वडील कर्त्या पिढीचे अडथळे बनतात. त्यांच्याविषयी मुलांमध्ये अपसूक अनस्था निर्माण होत राहते.

बालपणापासूनचं आयुष्य घड-विण्यासाठी बापाने घेतलेले सारे कष्ट विसरायला लागतात. अपंग बाप, बिमार आई-बाप आणि थकलेले आई-बाप आश्रमाकडे सुपूर्द केले जातात. नातवाची व अजोबाची गट्टी तुटल्या जाते. अविवेकी मुलगा बाईल विचारातून बायकोचा गुलाम बनतो. क्षणात जन्मापासून आई - वडिलांशी असलेली घट्ट नात्याची नाळ एका मिनिटात तोडून टाकतो . आई- बाप आश्रमात जावून पोरकेपणाचे जीवन कंठत असतात. भुतकाळव जीवनातील चांगल्या कर्माचे वाईट ओझे सहण करत असतात. कोणताच गुन्हा न करताही विचाराचे ओझे घेऊन आई-वडील विकाराने पछाडतात आणि आश्रमरूपी तुरूंगात कैदी बनून राहातात.

हे सारं घरात बारकाईने नातू टिपत असतो. आजोबासारखा मित्र तुटतो. या बंदडोर संस्कृतीत आजोबासारख्य दुसरा मित्र त्यास खेळण्यासाठी मुळीच नसतो व मिळतही नाही. तो एकटा आजी-अजोबाच्या अठवणीने झुरत राहतो.

एकदा शाळेत त्याच्या वर्गात 'आपल्या आवडत्या व्यक्ती' असा निबंध लिहायला दिला जातो.तो अजोबावर भरभरून लिहितो. तो निबंध सुंदर व प्रभावी ठरतो. विचार करावयास प्रवृत्त करतो. नातवास प्रिय असलेला अजोबा वडिलास कसा अप्रिय होतो? हेच मुख्य गुपित आजपर्यंत कोणासही कळत कसे नाही ? हा प्रश्न मुख्य प्रश्न बनून वैचारिक पातळीवर चर्चिला जातो.उकल कधीच होत नाही.

पुन्हा एकदा वर्गात सर्वांना एक सुंदर प्रतिकृती बनवून आणायला सांगितली जाते. कोन्ही मंदीर, कोन्ही ताजमहल, कोन्ही किल्ला, कोन्ही शाळा अशा सुंदर प्रतिकृती बनवतात. हा नातू मात्र स्वकल्पित एक सुंदर स्वप्नातलं घर बनवतो. हा त्या कृतीत ईतका मश्गूल व रममाण असतो; की शेवटच्या टप्प्यातील सजावटीत त्यास शाळेत जाण्याची वेळही लक्षात येत नाही. त्यास शाळेत जाण्याची आठवण सुद्धा राहात नाही.

शाळेतून फोन येतो तुमचा मुलगा शाळेत आलेला नाही. आज प्रोजेक्टचा शेवटचा दिवस तो सादर ही केलेला नाही. आई वडील ऑफिसला कामावर निघालेले असतात. जाता जाता ते मुलाला शाळेत सोडण्यासाठी त्याच्या सोबत जातात.

आई-वडील त्यास घाईघाईत शाळेत घेऊन जातात. गेल्या गेल्याा गेल्याच मुलाच्या प्रोजेक्टच्या सादरीकरणाचं आलाउन्सिंग होतं.

आई वडीला विचार करतात, 'कार्यालयात जाण्यासाठी वेळ झाला तरी चालेल पण मुलांचं सादरिकरण ऐकूनच जावू म्हणून ते दोघे तेथे थांबतात'. बनवलेल्या सुंदर प्रतिकृतीचे तो सादरीकरण करत असतो. तो त्या कृतीस नाव देत-ो 'सुंदर घराचं स्वप्न'. हॉल, किचन, ऑफिस अशी एक एक माहिती तो सांगत असतो. शेवटी एका सुंदर रुमची माहिती व वैशिष्ट्ये सांगतो. त्या अत्याधुनिक रूम माझ्यासाठी नसून फक्त माझ्या आजी-अजोबासाठी असेल. त्याचं सुंदर सादरीकरण संपवते.

परीक्षक त्यास प्रश्न विचारतात, 'तुझ्या बंगल्याच्या शेजारी वेगवेगळे हॉल दाखवले आहेस. खुप झाडे आणि मोठे पटांगण हा विस्तृत भाग कशासाठी आहे ? त्यावर त्या चौथीतल्या मुलांने उत्तर दिलं, 'मी आणि माझे अजोबा खुप चांगले मित्र पण आजी-अजोबास वृद्धाश्रमात जावे लागले. मला घरी एकट्यास अजोबा नसल्याने खूप कंटाळवाणे वाटायला लागते . आजी - अजोबास घरी आणण्यासाठी मी ही वरची सुंदर रुम बनवली. बगल्या शेजारच्या जागेत मी एक वृध्दाश्रम बनवण-ार आहे. त्यामुळे माझ्या आई-वडिलांना आजी-अजोबासारखे दुर जावे लागणार नाही. ते घराच्या शेजारी व जवळच माझ्या देखरेखीतच राहतील.'

कार्यक्रमातील सर्वांनी त्या छोट्याश्या मुलासाठी खुप टाळ्या वाजवल्या व तोंडभरून कौतुक केलं. कामावर जातांनाा त्यास सोडावयास आलेले आई - वडिल खजिल झाले.

त्यांना त्यांच्या चुकीचा खूप मोठा पश्चाताप झाला. त्यांच्या डोळ्यातून अश्रूंचे महापूर वाहू लागले.मुलांच्या निर्विकार निर्मळ सात्विक भावनेने त्यांचे डोळे कायमचे उघडले.

ऑफिसात कामावर जावयाचे सोडून ते थेट वृद्धाश्रमात गेले. आई वडिलांना माफी मागून त्यांना घरी घेऊन आले.


त्याचं बोलनं सहजच होतं पण आई वडीलांना व सर्वांना संदेश देणारं, लहान मनाचं निखळ भावविश्व वाटल. सर्वांना मनातून भावलं. मनातूस हेलावलं. विचार करायला आत्मप्रवृत्त केलं. जे घडलं ते निर्मल आणि निर्विकार होतं. तेथे आई - वडिल याांना. त्यांच्या कर्माची बोच त्यांना मान खाली घालायला लावणारी होती. अनैक प्रवचने ऐकून बोध झाला नसताना पण मुलांने झणझणीतणे आई - बापाचे डोळे उघडले होते. आजी आजोबापासून नातवास तोडणाऱ्या सर्व आई-बापास हा बोध आत्मपरीक्षण करायला लावणारा होता हे निश्चितच..

आपण जे करतो ते कधीतरी असेच आपणास अचानक येऊन भेटते. आपण जे करतो तेच आपणास भरावे लागते याचा प्रत्यय आई-बापास प्रत्यक्ष आला होता.

**– व्यंकटेश सोळंके,**
नांदेड
मो. ९९२२६५४७३२

# 'बाप कविता आधारवडाच्या' : पित्याच्या भावविश्वाचा हृदयस्पर्शी वेध

मराठी साहित्यविश्वात 'आई' या विषयावर विपुल लेखन झाले. आईच्या मायेचे, त्यागाचे, वात्सल्याचे असंख्य शब्दचित्रे उभी राहिली; परंतु 'बाप' या व्यक्तिम त्त्वातील निःशब्द वेदना, संघर्ष, जबाबदारी आणि प्रेमाचा अबोल स्पर्श यांना शब्द देणारे साहित्य तुलनेने कमी दिसते. कारण बाप समजून घेण्यासाठी केवळ भावना पुरत नाहीत; आयुष्याचा खडतर रस्ता चालावा लागतो. कवी चंद्रकांत भोपाळकर यांच्या 'बाप कविता आधारवडाच्या' या काव्यसंग्रहाने त्या अबोल, सावलीसारख्या जगणाऱ्या पित्याला शब्द दिले आहेत.




शंभर कवितांचा हा संग्रह केवळ कवितांचा संच नाही; तर भारतीय ग्रामीण व सामाजिक जीवना-तील पित्याच्या अस्तित्वाचा भावनिक इतिहास आहे. या संग्रहातील 'बाप' हा एखादा आदर्शवादी, काल्पनिक किंवा देवत्व प्राप्त केलेला पुरुष नाही; तो उन्हात राबणारा शेतकरी आहे, लेकरांच्या शिक्षणासाठी स्वतःच्या इच्छा मारून टाकणारा कामगार आहे, संसाराच्या ओझ्याखाली शांतपणे वाकलेला माणूस आहे, घरावर सावली धरून ठेवणारा आधारवड आहे.

कवी संग्रहाच्या सुरुवातीलाच एक महत्त्वाचा भावार्थ अधोरेखित करतो

बाप गर्द विस्तीर्ण झाड
उन्हा तन्हात जिंदगीच्या
बाप थंड पाण्याने भरलेला आड

आईचे प्रेम व्यक्त होते; पण बापाचे प्रेम अनेकदा घामातून, रात्रभर जागून केलेल्या काळजीतून, मुलांच्या भविष्यासाठी घेतलेल्या कर्जातून आणि स्वतःच्या दुःखाला गिळून टाकणाऱ्या शांततेतून व्यक्त होत असते. कवीने त्या शांततेलाच शब्द दिले आहेत. बापपण हे चिरस्थायी आहे हे टिपताना कवी म्हणतो..

भर भर निघून जातात दिवस
पण आठवण सरत नाही
बाप स्थलांतरीत होतो..
या देहातून त्या देहात
या पिढीतून त्या पिढीत
बापपण कधीच मरत नाही

या संग्रहातील अनेक कविता वाचताना जाणवतं की कवीने 'बाप' या शब्दाकडे केवळ भावनिक दृष्टीने पाहिलेलं नाही; तर सामाजिक आणि मानवी संदर्भात सुद्धा त्याचा विचार केला आहे. त्याचा काय गुन्हा? या कवितेत शेतकरी पित्याची वेदना अत्यंत जिवंतपणे व्यक्त होते

रात्रंदिवस कष्ट करतो,
फुरसतीचा वेळ नाही,
काबाडकष्ट करूनही
पोटा पाण्याचा मेळ नाही

ही कविता वाचताना एका शेतकरी बापाचं संपूर्ण आयुष्य डोळ्यांसमोर उभं राहतं. येथे कविता केवळ शब्द राहत नाही; ती समाजाच्या वेदनेची साक्ष बनते. स्वतःच्या मुलांसाठी झगडणारा, कर्जाच्या विळख्यात अडकलेला आणि तरीही जगण्याची लढाई न सोडणारा बाप कवीने अत्यंत प्रभावीपणे उभा केला आहे.'बाप आणि पळस' कवितेत कवी लिहितात

'जन्मभर पुण्याई कमावली
बाप पूर्वजन्मी मंदिराचा कळस असावा
वैशाखातही ताट उभा राहिला
बाप पूर्वी नक्की पळस असावा'

या कवितेतून बापाचा प्रखर संघर्ष कवी डोळ्यांसमोर उभा करतो. तर बापाचं चित्तर या कवितेत

रंगात मिसळून सुगंधी अत्तर
बापाचं रेखटावं चित्तर..

असे लिहीत बापाबद्दलची कृतज्ञता व्यक्त करतात.

या ओळीत 'बाप' हा शब्द एका सार्वत्रिक अनुभवात रूपांतरित होतो. समाजातील प्रत्येक घरात, प्रत्येक वर्गात, प्रत्येक संघर्षामध्ये हा 'बाप' वेगवेगळ्या रूपांनी जगताना दिसतो. ही कविता वाचताना वाचक नकळत स्वतःच्या वडिलांकडे परत पाहू लागतो.

संग्रहातील अनेक कवितांमध्ये बापाबद्दलचे प्रेम व्यक्त करताना कवीने अनेक प्रतिमा वापरल्या आहेत. बाप म्हणजे संरक्षण, आधार आणि स्वतः उन्हात तळून दुसऱ्याला गारवा देणारं झाड.. कवी अधोरेखित करतात. मुलांच्या आयुष्यावर संकटाचं ऊन लागू नये म्हणून स्वतः आयुष्यभर उन्हात उभा राहणारा बाप अनेक प्रतिमेतून समोर येतो.

परंतु, या कविता वाचताना प्रकर्षाने जाणवतं की आपण अनेकदा बापाचं मोल त्याच्या अनुपस्थितीमध्येच समजून घेतो. जेव्हा हा आधारवड कोलमडतो, तेव्हा जग किती परके होते, याचे दाहक वास्तव कवीने बाप गेला या कवितेत मांडले आहे

चिमणी उडून गेली
कावळे उडून गेले
बापाने घेता निरोप
सारे नातेवाईक सोडून गेले.

बापाच्या जाण्याने केवळ नातेवाईकच दुरावत नाहीत, तर घराचे सर्व आध्यात्मिक आणि भावनिक सुखच हरवून जाते. बापाचे घर असणे म्हणजेच विठ्ठलाची माऊली घरात असण्यासारखे आहे, हा अथांग भाव वारी नाही या कवितेत कवीने आळवला आहे

बाप नाही, वारी नाही
कीर्तन नाही, भजन नाही
पांडुरंगा... हाक देऊ कोणा
बाप माझा घरी नाही.

बापाच्या असण्या-नसण्याचा सर्वाधिक फटका आणि वेदना लेकीच्या आयुष्याला कशी व्यापून उरते, याचे काळजाला हात घालणारे वर्णन लेक या कवितेत आले आहे. बापाच्या मृत्यूनंतर आईचे वैधव्य आणि लेकीचे माहेर कसे पोरके होते, हे सांगताना कवी लिहितो

सारं सारं मग बदलत जातं
माहेरचा माणूस येणं बंद होतं
मायचं पांढरं शिपत कपाळ
बापाची किंमत सांगून जातं

या संग्रहाचं आणखी एक महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणजे त्यातील ग्रामीण मातीचा गंध. कवीच्या भाषेत कृत्रिमता नाही. ती गावाकडच्या जगण्याला स्पर्शून गेलेली भाषा आहे. त्यामुळे कविता अधिक जिवंत वाटतात. बाप हिंम तीचा गडी किंवा कास्तकारी बाप यांसारख्या कवितांमध्ये ग्रामीण जीवनातील संघर्ष इतका वास्तवदर्शीपणे येतो की वाचकाला कविता आणि वास्तव यांच्यातील सीमारेषाच मिटल्यासारखी वाटते.

कास्तकारी बाप या कवितेत कवीने शेतकरी पित्याची वेदना आणि व्यवस्थेविषयीचा आक्रोश अत्यंत प्रभावीपणे व्यक्त केला आहे.

सावकाराच्या फेऱ्या दाराशी,
दुःख रोज उदंड होतं,
निर्लज्ज होतात राजकारणी
आणि सरकार षंढ होतं...

या ओळींतून ग्रामीण शेतकरी पित्याची असहाय्यता आणि संताप दोन्ही प्रकर्षाने समोर येतात. एकीकडे कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला शेतकरी आणि दुसरीकडे त्याच्या वेदनेकडे उदासीन असलेली व्यवस्था हे वास्तव कवीने थेट आणि निर्भीड शब्दांत मांडले आहे. 'सरकार षंढ होतं' ही अभिव्यक्ती केवळ रोष व्यक्त करत नाही; तर शेतकरी प्रश्नांबाबतच्या निष्क्रिय व्यवस्थेवर तीक्ष्ण भाष्य करते. त्यामुळे ही कविता वैयक्तिक दुःखापुरती मर्यादित राहत नाही; ती सामाजिक आक्रोशाचे रूप धारण करते.

हा संग्रह केवळ भूतकाळातील किंवा ग्रामीण बापापुरता मर्यादित नाही, तर तो आधुनिक काळातील बदललेल्या नातेसंबंधांवरही प्रभावी भाष्य करतो. हरवलाय बाप...या कवितेत कवी म्हणतात

फेसबुक, इंस्टाग्रामवर
त्याला करता येईल का फॉलो?
व्हॉट्सअप व्हिडिओ कॉल करून
त्याला म्हणता येईल का हॅलो?

या ओळी उपरोधिक असल्या तरी त्यामागे खोल सामाजिक वेदना दडलेली आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे जग जवळ आले; पण माणसं मात्र भावनिकदृष्ट्या दूर गेली. सोशल मीडियावर सतत सक्रिय असणारी पिढी स्वतःच्या बापाशी प्रत्यक्ष संवाद साधण्यात मात्र कमी पडते, ही खंत कवीने अत्यंत मार्मिकपणे व्यक्त केली आहे.

बापाच्या पश्चात कौटुंबिक आणि मानसिक आयुष्य किती निस्तेज आणि रंगांशिवाय होऊन जाते, याचे आर्त रूप परत येशील तेंव्हा.. या कवितेत पाहायला मिळते. कवी आपल्या वडिलांना पुन्हा परत येण्याची आळवणी करताना लिहितो

तू परत येशील तेंव्हा
हाती जरासा कुंचला आण
बेरंग झालंय रे आयुष्य
पुन्हा रंगव तू छान

या संग्रहातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यातील भावनांचा प्रामाणिकपणा. कवी कुठेही कृत्रिम भावुकतेचा आधार घेत नाही. उलट, साध्या शब्दांतून तो इतकं मोठं सत्य सांगतो की कविता वाचताना अनेकदा डोळे ओलावतात. राहून गेलं...' किंवा बाप आठवतो निरंतर यांसारख्या कवितांमध्ये मृत्यूनंतर वडिलांविषयीची मनात राहिलेली प्रेमाची भावना आणि कृतज्ञता फार हळुवारपणे समोर येते.

उगीच नाही आला गालिचा पायी
यासाठी आयुष्यभर त्याचं पाऊल तापलं आहे
आपल्या चिमुटभर सुखासाठी
बापानं आपलं आयुष्य वेचलं आहे

अशा आशयाच्या अनेक ओळी वाचताना वाचक स्वतःच्या आयुष्याशी संवाद साधू लागतो. हीच या संग्रहाची खरी ताकद आहे.

साहित्यिक दृष्टिकोनातून पाहिल्यास या कवितांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रतीकात्मकता, संवादात्मक शैली आणि गेय लय दिसते.

कवी चंद्रकांत भोपाळकर हे आकाशवाणीवरील निवेदक, संवेदनशील लेखक आणि अनुभवी कवी म्हणून परिचित आहेत. त्यांच्या आयुष्याचा अनुभव, ग्रामीण जी-वनाशी असलेली जवळीक आणि मानवी नात्यांबद्दलची जाणीव या कवितांमध्ये प्रकर्षाने जाणवते. त्यांनी 'बाप' या विषयाला केवळ गौरवगीत बनू दिलेलं नाही; तर त्यातील संघर्ष, वेदना, अपमान, एकटेपण आणि निःशब्द प्रेम यांचं वास्तव जपलं आहे.

'बाप कविता आधारवडाच्या' हा काव्यसंग्रह वा-चताना अनेकदा असं वाटतं की आपण केवळ कविता वाचत नाही, तर आपल्या आयुष्यात शांतपणे उभ्या असलेल्या त्या माणसाला नव्याने समजून घेत आह-ोत. ज्याने आयुष्यभर स्वतःसाठी काही मागितलं नाही, पण लेकरांना सर्व काही दिलं त्या 'बाप' नावाच्या आधारवडाला वाहिलेली ही अत्यंत हृदयस्पर्शी शब्दांजली आहे.

मराठी साहित्यात पित्याच्या भावविश्वाला इतक्या सातत्याने, विविध छटांसह आणि आत्मीयतेने केंद्रस्थानी आणणारे संग्रह फार कमी आहेत. म्हणूनच हा संग्रह केवळ वाचला जात नाही; तो मनात दीर्घकाळ जगत राहतो.

'बाप कविता आधरवडाच्या' या काव्य संग्रहाचे अर्थपूर्ण आणि भावपुर्ण मुखपृष्ठ श्री संतोष घोंगडे यांनी रेखाटले आहे..तसेच काव्यसंग्रहात अनेक ठिकाणी कवितेच्या भावार्थनुसार चित्र रेखाटले असून, ते कविता अधिक बोलकी करतात.पुणे येथील शिवानी प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या या काव्यसंग्रहाचे वाचक आणि समीक्षक नक्कीच स्वागत करतील ही अपेक्षा आहे.

**– शेख एजाज**
सहशिक्षक.
मालेगाव,नांदेड

# नशिबाच्या पल्याड : कर्माने कोरलेले भविष्य

मानवी जीवनाच्या प्रवासात नशीब आणि कर्म या दोन संकल्पनांविषयी नेहमीच चर्चा होत असते. अनेकदा आयुष्यातील अनपेक्षित वळणांना आपण नशीब म्हणतो, तर स्वतःच्या मेहनतीने मिळालेल्या यशाला कर्तृत्वाचे फळ मानतो. पण खरोखरच आयुष्याचे सूत्र नशिबाच्या हातात आहे, की कर्माच्या? खोलवर विचार केल्यास असे दिसते की, नशीब हे केवळ एक संधी असू शकते, पण ती संधी सत्यात उतरवण्याचे सामर्थ्य केवळ आणि केवळ तुमच्या कर्मात असते.

**नशीब आणि कर्माचे वैज्ञानिक समीकरण**

विज्ञानाच्या भाषेत सांगायचे तर, कर्म आणि नशीब यांचा संबंध कार्यकारण भावाशी (Cause and Effect) आहे. न्यूटनचा गतीविषयक तिसरा नियम सांगतो की, प्रत्येक क्रियेला समान आणि विरुद्ध प्रतिक्रिया असते. आपण ज्याला नशीबसमजतो, तो प्रत्यक्षात आपण भूतकाळात केलेल्या विचारांचा, निर्णयांचा आणि कृतींचा एकत्रित संचय (Cumulative Effect) असतो. ज्याप्रमाणे बियाणे पेरल्याशिवाय फळ मिळत नाही, त्याचप्रमाणे तुम्ही आज करत अस-लेले कष्ट (Input) हे भविष्यातील नशिबाचा (Output) आधार ठरतात. त्यामुळे नशीब हे आकस्मिक नसून, ते तुमच्या आजच्या कर्माचे वैज्ञानिक प्रतिबिंब आहे.

**यशाचा काळ आणि कर्माची परिपक्वता**

आयुष्याच्या कोणत्या टप्प्यावर यश मिळेल, हे नशिबाच्या तारखेवर अवलंबून नसून, ते तुमच्या कर्माच्या तीव्रतेवर आणि तयारीवर अवलंबून असते. काहींना यश लवकर मिळते, तर काहींना उशिरा. यश मिळण्यास विलंब होतो, तेव्हा तो काळ वाया गेलेला नसतो; तर तो काळ तुम्हाला आणि तुमच्या कार्याला परिपक्व करत असतो. याच प्रवासात एक महत्त्वाची गोष्ट समजतेफ कठीण काळात तुमच्यासोबत कोण राहते आणि यशाच्या शिखरावर गेल्यावर कोण दूर होते. यश मिळायला जेव्हा वेळ लागतो, तेव्हा आयुष्यातील खऱ्या माणसांची ओळख पटते. ही ओळख म्हणजेच तुमच्या कर्माची खरी कमाई असते.

**इतिहासातील दीपस्तंभ: कर्माने घडवलेली नशिबे**



छत्रपती शिवाजी महार-ाज: स्वराज्याची संकल्पना मांडतानामहाराजां-समोर नशिबाची साथ नव्हती, तर प्रतिकूल परिस्थिती होती. तरीही त्यांनी व्यवस्थापन, नीतिमत्ता आणि रयतेची साथ या कर्माच्या बळावर मूठभर मावळ्यांसह बलाढ्य शत्रूंना नमवले. त्यांनी सिद्ध केले की, नशिबाच्या चिठ्ठ्या ओढण्यापेक्षा कर्माच्या तलवारीने काळ घडवणे श्रेष्ठ असते.

**महात्मा जोतिराव आणि सावित्रीबाई फुले:** सामाजिक गुलामगिरीच्या नशिबाला छेद देण्याचे काम त्यांनी आपल्या कर्मातून केले. सावित्रीबाईंवर झालेली चिखलफेक हे त्यांच्या नशिबाचे दुर्दैव नव्हते, तर तो त्यांनी स्वीकारलेल्या क्रांतीच्या कर्माचा एक भाग होता. आज-चे शिक्षित समाज हे त्यांच्या त्यावेळच्या अहोरात्र कर्माचे फळ आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर:** तूच आ-हेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार हे ब्रीदवाक्य त्यांच्या संघर्षातून जन्मले. नशिबाने अस्पृश्यतेची बेडी दिली असतानाही, त्यांनी आपल्या कर्माने भारतीय राज्यघटना लिहीत नशिबाची दिशाच बदलून टाकली.

**झाशीची राणी लक्ष्मीबाई:** आयुष्यात दुःखाचे डोंगर कोसळले असताना नशिबाला दोष न देता, त्यांनी आपल्या शौर्याच्या कर्माने इतिहासात अमरत्व मिळवले.

**यशाची किंमत आणि नाती**

जीवनात यशाच्या मागे धावताना अनेकदा जवळची माणसे दुरावतात. पण लक्षात घ्या, जर यश मिळवण्याच्या प्रक्रियेत तुमची नीतिमत्ता आणि माणुसकी जपली असेल, तर तुमच्या कर्माचे यश हे केवळ भौतिक नसून ते समाधानी असते. यश मिळाल्यावर अहंकार बाळगणे हे कर्माचे अध:पतन आहे, तर संघर्षाच्या काळात सोबत असलेल्यांना विसरून न जाणे, हेच खऱ्या यशस्वी माणसाचे लक्षण आहे.

**निष्कर्षाप्रत : आयुष्याचे शिल्पकार**

आयुष्याचे गणित हे नशिबाच्या जुगारावर आधारित नसून, ते कर्माच्या गुंतवणुकीवर आहे. नशिबाला दोष देणे सोपे असते, कारण त्यामुळे आपण स्वतःच्या जबाबदारीतून मुक्त होतो. परंतु, जे स्वतःच्या कर्माची जबाबदारी घेतात, तेच काळाच्या पडद्यावर आ-पली नाममुद्रा उमटवतात. नशीब कदाचित तुम्हाला दिशा दाखवेल, पण त्या मार्गावर चालण्याचे आणि अंतर पार करण्याचे काम तुम्हाला स्वतःलाच करावे लागेल. म्हणून, नशिबाच्या खेळाकडे दुर्लक्ष करून आपल्या कर्माच्या जोरावर नशिबाचे शिल्पकार बना. तुम्ही आज जे पेरता, तेच उद्याच्या नशिबाचे पीक असते. नशिबाच्या नावावर रडणे थांबवा आणि आपल्या कर्माने उद्याचे भाग्य आजच घडवायला सुरुवात करा!

**–रोहित विलासराव भोसीकर**
संचालक :
भोसीकर फूड्स, नांदेड
मो. ८८०५५७५५५५

# खडतर जीवनमार्ग

खडतर जीवनमार्ग माणसा
चालत रहा तू दिन रात
खंत नको तुज अपयशाची
टाकून दे न्यूनगंडाची कात
तुझे भविष्य तुझ्याच हाती
आत्मविश्वासाची असू दे जोड
कर्माचे फळ मिळते केवळ
दुनियेची तू चिंता सोड
रोज दिवस हा नवा उजडतो
सोबत घेऊन नवा प्रकाश
खुणवती तुज मुक्त पाखरे
उठ जागा हो स्पर्शिण्या आकाश
दुःखाचे तम तूच सारीशी
तुझ्याच हाती मनाची दोर
खचू नको लढण्या संकटाशी
नको होऊस क्षणभर कमजोर
तूच घडविसी तूच मोडीशी
तुझ्या जीवनाचा तू शिल्पकार
चिंतन कर तू चिंता सोडून
तरच होईल साक्षात्कार
जीवन तुझे बनावे सुगंधित
उगाळून स्वतःला होऊन सहान
जगास कळावी महती तुझी रे

आत्मज्ञान घेऊन हो महान

**पवन श्रीरंगसा कुसुंदल,**
नांदेड
मो.९०७५५९५६९५

# विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी नोडल अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र विधानपरिषदेच्या नांदेड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक २०२६ अनुषंगाने नियुक्त नोडल अधिकारी व त्यांच्या सहायकांचे प्रशिक्षण जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे नुकतेच पार पडले.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सर्व नोडल अधिकाऱ्यांना निवडणुकी–संदर्भातील सोपविलेल्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये अधिक काटेकोरपणे पार पाडण्याच्या सूचना दिल्या.

प्रशिक्षणावेळी अपर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) राजकुमार माने, उपजिल्हाधिकारी (रोहयो) हनमंत कोळेकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे यांच्यासह सर्व नोडल अधिकारी व त्यांचे सहायक उपस्थित होते.

निवडणूक कामकाज अधिक सुलभ व प्रभावीपणे पार पाडण्यासाठी विविध कक्षांची स्थापना करण्यात आली असून, त्यासाठी नोडल अधिकारी व सहायक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये प्रशिक्षण व्यवस्थापन, कायदा व सुव्यवस्था, नामनिर्देशन, आचारसंहिता, माहिती व्यवस्थापन, मतदान कर्मचारी व्यवस्थापन, मतदार यादी व मतदान केंद्र व्यवस्थापन, मतपत्रिका छपाई व वाटप, स्ट्राँग रूम व मतमोजणी व्यवस्थापन, उमेदवार व राजकीय पक्ष निवडणूक खर्च तपासणी व नियंत्रण, जिल्हास्तरीय कक्ष, निवडणूक निरीक्षक कक्ष, वाहन अधिग्रहण व वाहतूक व्यवस्थापन, मतपेटी व मतदान साहित्य वाटप तसेच संगणकीकरण व्यवस्थापन आदी कक्षांचा समावेश आहे. सर्व नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनी निवडणुकीशी संबंधित जबाबदाऱ्या व कर्तव्ये सक्षमपणे पार पाडावीत, असे निर्देश यावेळी देण्यात आले.

निवडणूक विभागाचे उपजिल्हाधिकारी राजकुमार माने यांनी विविध कक्ष तसेच नोडल अधिकाऱ्यांच्या कामकाज व जबाबदाऱ्यांबाबत माहिती दिली.

# सेवानिवृत्ती; नव्या आयुष्याची सकारात्मक सुरुवात

## जि. प. चा अभिनव उपक्रम; दोन दिवस विविध विषयांवर मार्गदर्शन व मंथन



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा परिषदेच्या वतीने पुढील सहा महिन्यांत विविध विभागांतून सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी सेवानिवृत्ती आणि सेवानिवृत्तीनंतरचे जीवन या विषयावर आयोजित दोन दिवसीय मार्गदर्शनपर प्रशिक्षण शिबीर उत्साहात संपन्न झाले. जिल्हा परिषद येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांच्या हस्ते झाले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी महेश देशमुख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी मयूरकुमार आंदेलवाड, डॉ. प्रवीणकुमार घुले, शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी विशाल हिवरे, दिलीपकुमार बनसोडे, हातमोडे आदी मान्यवर उपस्थित होते.

दोन दिवस चाललेल्या या प्रशिक्षण शिबिरात सेवानिवृत्तीनंतरचे आर्थिक नियोजन, पेन्शन व निवृत्तीवेतन–विषयक माहिती, गुंतवणूक नियोजन, आरोग्य व जीवनशैली, सुरक्षितता, आर्थिक फसवणूक टाळण्यासाठी उपाययोजना, कायदेशीर जागरूकता, आरोग्य विमा, कर्ज व आर्थिक सहाय्य तसेच निवृत्तीनंतर उपलब्ध विविध संधी याबाबत तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिरात वित्त विभागाचे विशाल हिवरे, एसबीआय बँकेचे सतीश राऊत, निखिल लिमकर, विजय गंगवानी, डॉ. मनीषा जाधव, हरीश यादव, सेवानिवृत्त उपमुख्य कार्यकारी अधिकारी गुडदे, सागर कोलेश्वर, कपिल ढवळे तसेच विकास अधिकारी ज्ञानेश्वर थेटे यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

जिल्हा परिषदेच्यावतीने सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यां–साठी अशा प्रकारचे व्यापक मार्गदर्शन व नियोजनपर प्रशिक्षण प्रथमच आयोजित करण्यात आले होते. या उपक्रमाला सहभागी कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या प्रशिक्षण शिबिराचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी मिलिंद व्यवहारे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्य लेखा व वित्त अधिकारी कार्यालयातील अधिकारी, सामान्य प्रशासन विभागातील अधिकारी, अधीक्षक शिवसांभ चड्डु, गजेंद्र श्रीरामवार, सीएम फेलो भार्गवी मुंडे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहायक शुभम तेलेवार, कुलदीप जोशी, साईचरण मुगावे, बालाजी आवर्दे, बालाजी टोके, रणजित गजभारे, सुरज नाईक, आतुल अकेमवार, ओमकार पांचाळ आदींनी पुढाकार घेतला.

यावेळी सहभागी प्रशिक्षणा–र्थ्यांना प्रमाणपत्र तसेच जिल्हा परिषदेचा लोगो असलेला कप भेट म्हणून देण्यात आला.

सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी जिल्हा परिषदेने आयोजित केलेला हा उपक्रम अत्यंत अभिनव आणि प्रेरणादायी ठरला. अशा प्रकारचे नियोजनबद्ध मार्गदर्शन करणारी राज्यातील पहिलीच पुढाकार असल्याची भावना सहभागी कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली.

**दुसऱ्या टप्प्यातील प्रशिक्षण शिबीर २५ व २६ मे रोजी**

पुढील सहा महिन्यांत विविध विभागांतून सेवानिवृत्त होणाऱ्या उर्वरित १२५ कर्मचाऱ्यांसाठी दि. २५ व २६ मे रोजी जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात येणार आहे. तरी संबंधित कर्मचाऱ्यांनी या प्रशिक्षण शिबिरात उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# जनगणना कामाच्या पाहणीसाठी केंद्रीय पथकाची लोहा तालुक्यास भेट



**नांदेड (प्रतिनिधी)–** जनगणना २०२७ अंतर्गत सुरू असलेल्या कामाच्या पाहणीसाठी शुक्रवार, दि. २२ मे २०२६ रोजी जनगणना केंद्रीय पथकाने लोहा तालुक्यास भेट दिली.

या पथकात जनगणना सहसंचालक शर्मा, सहायक संचालक पांडे, बी. प्रसाद तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथील जनगणना कक्ष सहाय्यक लतीफ पठाण यांचा समावेश होता.

संबंधित अधिकाऱ्यांनी सर्व पर्यवेक्षकांची बैठक घेऊन आवश्यक सूचना व मार्गदर्शन केले. तसेच तालुक्यात आतापर्यंत झालेल्या जनगणना कामाचे कौतुक करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी लोहा जनगणना ग्रामीण चार्ज अंतर्गत सर्वप्रथम जनगणनेचे नियुक्त काम पूर्ण करणारे प्रगणक लिंगोजी गणपती वाघमारे (सहशिक्षक) तसेच संबंधित पर्यवेक्षकांचा सत्कार करण्यात आला.

तहसीलदार तथा चार्ज अधिकारी (ग्रामीण) लोहा विठ्ठल परळीकर यांनी नियुक्त ६४ पर्यवेक्षकांना त्यांच्या अखत्यारीतील ३५९ प्रगणकांकडून जनगणनेचे काम अचूक व वेळेत पूर्ण करून घेण्याच्या सूचना दिल्या आणि पुढील कामकाजासाठी शुभेच्छा दिल्या.

# नांदेड विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची द्विवार्षिक निवडणुकीच्या अनुषंगाने विविध आदेश निर्गमीत

**नांदेड (प्रतिनिधी) –**भारत निवडणूक आयोगाने नांदेड विधान परिषदेसह महाराष्ट्र विधान परिषदेच्या १६ स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची द्विवार्षिक निवडणूक–२०२६ ची सोमवार, दि. १८ मे २०२६ रोजी घोषणा केली आहे. या घोषणेच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आली आहे. नांदेड जिल्ह्यात नांदेड विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची द्विवार्षिक निवडणूक–२०२६ ची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पडावी या दृष्टीकोणातून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये जिल्हा दंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी विविध आदेश सोमवार, दि. १८ मे २०२६ रोजी निर्गमीत केले आहेत. हा आदेश निर्गमीत केल्याच्या दिनांकापासून २५ जून २०२६ रोजी २४ वाजेपर्यंत नांदेड जिल्ह्यात लागू राहील.

**शासकीय–निमशासकीय विश्रामगृहाचा वापर**

शासकीय व निवडणुकीच्या कामावर असलेले अधिकारी–कर्मचारी यांच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस नांदेड जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय विश्रामगृहाचा वापर करणे, संबंधित विभागाने अधिकृत परवाना असल्याशिवाय किंवा सक्षम अधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय प्रवेश करण्यास प्रतिबंध केले आहे.

**ध्वनिक्षेपक–ध्वनिवर्धकाचा वापर नियमन व नियंत्रण**

कोणतीही व्यक्ती, संस्था, पक्ष व पक्षाचे कार्यकर्ते यांना ध्वनीक्षेपक व धवनिवर्धकाचा वापर सक्षम प्रधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय करता येणार नाही. फिरत्या वाहनांवर ध्वनिक्षेप व ध्वनिवर्धकाचा वापर करता येणार नाही.

महाराष्ट्रशासन पर्यावरण विभाग, शासन निर्णय ३१ जुलै २०१३ नुसार ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धकाचा वापर ध्वनि प्रदुषणाची पातळी विहित मर्यादेत राखून करावी. ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धकाचा वापर सकाळी ६ वाजेपुर्वी आणि रात्री १० वाजेनंतर करता येणार नाही.

**शासकीय वाहनांच्या गैरवापरास प्रतिबंध**

नांदेड जिल्ह्यामध्ये निवडणूक कालावधीत कोणत्याही वाहनांच्या ताफ्यामध्ये तीनपेक्षा जास्त मोटारगाडया अथवा वाहने (Cars/Vehicles) वापरण्यास प्रतिबंधीत केले आहे.

**वाहनांवर पक्ष प्रचाराचे कापडी फलके, झेंडे लावणे आदी बाबींसाठी प्रतिबंध**

जिल्ह्यात निवडणूक प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांवर पक्ष प्रचाराचे कापडी फलक, झेंडे लावणे इत्यादी बाबीसाठी प्रतिबंध करण्यात आले आहे. फिरत्या वाहनांवर पक्ष प्रचाराचा झेंडा हा वाहनाच्या डाव्या बाजूला विंड स्क्रीन ग्लासच्या पुढे राहणार नाही आणि तो त्या वाहनाच्या टपापासून २ फुट उंचीपेक्षा जास्त राहणार नाही. प्रचाराच्या फिरत्या वाहनावर कापडी फलक वाहन चालकाच्या आसनामागे वाहनाच्या डाव्या व उजव्या बाजूनेच लावण्यात यावा, इतर कोणत्याही बाजूस तो लावता येणार नाही. फिरत्या वाहनावर लावावयाचा पक्ष प्रचाराचा झेंडा किंवा कापडी फलक संबंधित पक्षाचे जिल्हाध्यक्ष, उमेदवार व उमेदवाराचे निवडणूक प्रतिनिधी यांच्या वाहनांव्यतिरिक्त इतर कोणत्याही वाहनावर लावता येणार नाही.

**तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यावर निर्बंध**

धार्मिक स्थळे, रुग्णालये किंवा शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणा जवळपास तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यावर निर्बंध लागू राहतील. नांदेड जिल्हा हद्दीत निवडणूक कालावधीत धार्मिक स्थळे, रुग्णालये किंवा शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणा जवळपास तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यास याद्वारे प्रतिबंधीत केले आहे.

# पत्रकार निळेकर यांना समाजभूषण पुरस्कार जाहीर



**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेडच्या 'सिडको' परिसरातील रहिवासी न्यूज पोर्टलचे संपादक तथा पत्रकार संजय मधुकरराव वाघमारे (निळेकर) यांना छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार घोषित करण्यात आला आहे.

अहमदपूर येथील अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सच्या वतीने फुले–आंबेडकरी सामाजिक चळवळीत संजय निळेकर यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून दिलेल्या सामाजिक योगदानाची दखल घेऊन छत्रपती राजर्षी शाहू महाराज 'समाजभूषण–२६' पुरस्कार घोषित करण्यात आला आहे.

# पाण्यासाठी बोर पाडणाऱ्या महिलेला जीवे मारण्याची धमकी, अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या गवळीपुरा परिसरात स्वतःच्या घरासमोरील जागेत बोअरवेलचे काम करणाऱ्या ५२ वर्षीय महिलेला १० जणांनी जातीवाचक शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात अॅट्रॉसिटी कायद्यासह गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी शोभा देवराव नवघडे (वय ५२) यांच्या तक्रारीनुसार दिनांक २० मे २०२६ रोजी सायंकाळी ५:३० वाजता त्या त्यांच्या घरासमोरील मोकळ्या जागेत बोअरवेल पाडत होत्या. यावेळी प्रल्हाद अहिरे, मोहन किशनलाल अहिरे, प्रवीण दशरथ अहिरे, दशरथ किशन अहिरे, जिगु श्यामलाल अहिरे, परशु किशनलाल अहिरे, अभिजीत परशु अहिरे, शुभम परशु अहिरे, अंकीत यादव अहिरे व सागर यादव अहिरे हे १० जण तेथे आले. ही जागा आमची आहे, तुम्ही बोर कसा पाडता? असे म्हणत त्यांनी काम बंद पाडले. शोभाताई यांनी विरोध करताच आरोपींनी तुम्ही नीच जातीचे, तुमची हिंमत कशी झाली? अशी जातीवाचक शिवीगाळ सुरू केली. इथून हाकलून देऊ, पुन्हा दिसला तर जिवंत सोडणार नाही अशी धमकी देत त्यांनी दादागिरी केली. यावेळी शोभा नवघडेंच्या मुली, सासू कमलबाई व उमाबाई यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला असता त्यांनाही शिवीगाळ करण्यात आली असल्याचे सांगण्यात आले.

या घटनेनंतर फिर्यादींनी २१ मे रोजी रात्री १०:३६ वाजता वजिराबाद पोलीस ठाण्यात तक्रार दिली. वजिराबाद ठाण्याचे पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांनी रात्री ११ वाजता वरील दहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. तपास उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) रामेश्वर व्यंजने करत आहेत.

# शासनाच्या पवित्र पोर्टलला अंशकालीन क्रीडा निदेशकांचा विरोध, शिक्षण मंत्र्यांना निवेदन

## लवकरच मार्ग काढू; शिक्षण मंत्र्यांनी केले अश्वस्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** मागील पंधरा वर्षांपासून राज्यासह जिल्हाभरात मोठ्या प्रमाणात अंशकालीन क्रीडा निदेशक जिल्हा परिषद शाळेवर कार्यरत आहेत. तुटपुंज्या मानधनावर सेवा देत आपला उदरनिर्वाह करतात, परंतु नुकत्याच शासनाच्या एका परिपत्रकामुळे त्यांच्यात खळबळ उडाली आहे. राज्यात जवळपास ४८६० क्रीडा शिक्षकांच्या जागा रिक्त असून, त्या जागा शासनाच्या पवित्र पोर्टलद्वारे लवकरच भरण्यात येतील, असे परिपत्रक निघाल्याने कार्यरत क्रीडा निदेशकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. याप्रकरणी



त्यांनी मुंबई येथे शिक्षण मंत्री दादा भुसे यांना निवेदन देऊन लक्ष वेधले.

महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाने २ जानेवारी २०२६ रोजी हा शासन निर्णय जारी केल्याने राज्यभरातील ४,८६० अंशकालीन क्रीडा निदेशकांपैकी १२०० शिक्षक भयभीत झाले आहेत. आम्हाला सेवेत कायम करून घ्यावे, अशी मागणी मागील अनेक वर्षापासून त्यांनी शासनाकडे लावून धरली, परंतु त्यांना अद्याप न्याय मिळाला नाही. राज्याचे शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव यांनाही अनेक वेळा निवेदन देण्यात आले. यासोबतच कला व कार्यानुभव या पदावर त्यांचे समायोजन केल्यास या पदालाही न्याय देता येईल. एवढेच नाही तर कार्यरत अंशकालीन क्रीडा शिक्षकांनी अडीच हजार कोटी विद्यार्थ्यांच्या देशभक्तीपर कवायती गीतं सादर करुन शालेय शिक्षण मंत्रालयाला सादर केले आहे, आणि विद्यार्थ्यांच्या कला, क्रीडा गुणामध्ये भर टाकली आहे.

आजही अनेक जिल्हा परिषदेच्या शाळांवर नियमित शिक्षक गैरहजर असल्यास त्या शिक्षकाचे कामही अंशकालीन क्रीडा निदेशकांना करावे लागते. परंतु पवित्र पोर्टलनुसार ४,८६० जागा भरण्यात येणार असल्याने कार्यरत क्रीडा निदेशकामध्ये संभ्रम निर्माण झाला असून आपल्या न्याय हक्कासाठी त्यांनी थेट मंत्रालय गाठले. यावेळी अंशकालीन क्रीडा निदेशक संघर्ष समितीचे राज्य अध्यक्ष एन. एन. वाघमारे, उपाध्यक्ष अशोक देशमुख, आनंद पाटील आणि अरुण बावनवाडीकर यांचा सहभाग होता.

# २५ वर्षांपासून बंद असलेला शिवरस्ता १.५ कि.मी.पर्यंत खुला



**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड तालुक्यातील सुगाव बुद्रुक, सुगाव खुर्द ते भानपूर या मार्गावरील शिवरस्त्यावर गेल्या अनेक वर्षांपासून अतिक्रमण झाले होते. संबंधित शेतकऱ्यांना रस्त्याचे महत्त्व समजावून सांगून त्यांच्या सहमतीने शुक्रवार, दि. २२ मे २०२६ रोजी सुमारे १.५ कि.मी. लांबीचा रस्ता खुला करण्यात आला.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ तसेच तहसीलदार संजय वारकड यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड तालुक्यात शिवरस्ते व पाणंद रस्ते मोकळे करण्याची मोहीम राबविण्यात येत आहे.

या कारवाईवेळी नायब तहसीलदार (महसूल) सुनिल माचेवाड, मंडळ अधिकारी नाळेश्वर, कुणाल जगताप, तलाठी सज्जा वाघी राजेश बरोडा तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक व शेतकरी उपस्थित होते.

यापुढेही अशाच प्रकारचे शिवरस्ते खुले करण्यात येणार असल्याचे तहसीलदार संजय वारकड यांनी सांगितले. तसेच रस्ते अडविणाऱ्या शेतकऱ्यांना पुढे शासकीय लाभांपासून वंचित ठेवण्याचा इशाराही त्यांनी दिला.

पावसाळ्यात शेतात जाण्यासाठी शेतकऱ्यांना चिखलातून जावे लागत होते. आता रस्ता मोकळा झाल्याने शेतकऱ्यांनी साखर वाटून आनंद व्यक्त केला.

यावेळी दत्ता भोसले, बाबुराव शिंदे, नामदेव शिंदे, दत्तराव तातेराव भोसले, विजय भोसले, गंगाधर भोसले, संतोष भोसले, जळबाजी भोसले आदी शेतकरी उपस्थित होते.

# सोयाबीन, तूर, मूग, उडीद, ज्वारी प्रमाणित बियाणे वाटपासाठी वैयक्तिक शेतकऱ्यांनी अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी) –**खरीप हंगाम २०२६ मध्ये विविध योजनांतर्गत प्रमाणित बियाणे वितरणासाठी महाडीबीटी प्रणालीवर अर्ज प्रक्रिया सुरू आहे. कडधान्य आत्मनिर्भरता अभियान अंतर्गत तूर, मूग, उडीद, (पाच वर्षाच्या आतील वाण ६ हजार रुपये प्रती क्विंटल व पाच वर्षावरील, परंतु १० वर्षाच्या आतील वाण– ३ हजार रुपये प्रती क्विंटल अनुदान) या योजनेत अधिसूचित वाणांसाठी अर्ज करता येणार आहे.

राष्ट्रीय खाद्यतेल अभियानातील तेलबिया योजनेत सोयाबीन (५ वर्षांच्या आतील वाण ११ हजार रुपये प्रती क्विंटल अनुदान) अधिसूचित वाणांसाठी अर्ज करता येणार आहे. लाभार्थी निवड प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर होणार आहे. प्रमाणित बियाणे वितरणासाठी सोयाबीन, तूर, मूग, उडीद, ज्वारी या पिकांसाठी वैयक्तिक शेतकऱ्यांनी अॅग्रीस्टॅक फार्मर आयडीद्वारे महाडीबीटी पोर्टलवर बियाण्यांसाठी अर्ज करावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

शेतकऱ्यांना अर्ज करण्यासाठी(https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/griLogin) या संकेतस्थळाचा वापर करावा. योजनेबाबत अधिक माहितीसाठी कृषी विभाग, महाराष्ट्र राज्याचे www.krishi.maharashtra.gov.in संकेतस्थळ पाहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# गट 'बी' सीबीटी परीक्षेमुळे नांदेड विभागातील काही गाड्या रद्द

**नांदेड (प्रतिनिधी)–** रविवार, दि. २४ मे २०२६ व ३१ मे २०२६ रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या ग्रुप 'B' CBT परीक्षेमुळे काही प्रवासी गाड्या परिचालन कारणास्तव रद्द करण्यात आल्या आहेत, याची रेल्वे प्रवाशांनी नोंद घ्यावी, असे रेल्वे प्रशासनाने कळविले आहे.

रद्द करण्यात आलेल्या गाड्यांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे : गाडी क्रमांक ७७६२३ पूर्णा–जालना DEMU दिनांक २३ मे २०२६ रोजी रद्द राहील.

गाडी क्रमांक ७७६२१/७७६२२ जालना–नगरसोल–जालना DEMU दिनांक २४ मे २०२६ रोजी रद्द राहील. गाडी क्रमांक ७७६२४ जालना–नांदेड DEMU दिनांक २४ मे २०२६ रोजी रद्द राहील.

गाडी क्रमांक ५७६५१ नांदेड–मनमाड पॅसेंजर दिनांक २४ मे २०२६ रोजी रद्द राहील. गाडी क्रमांक ५७६५२ मनमाड–नांदेड पॅसेंजर दि. २५ मे २०२६ रोजी रद्द राहील.

गाडी क्रमांक ७७६०६ नांदेड–मेडचल DEMU दिनांक २५ मे २०२६ रोजी रद्द राहील.

गाडी क्रमांक ७७६२३ पूर्णा–जालना DEMU दिनांक ३० मे २०२६ रोजी रद्द राहील.गाडी क्रमांक ७७६२१/७७६२२ जालना–नगरसुल– जालना DEMU दिनांक ३१ मे २०२६ रोजी रद्द राहील. गाडी क्रमांक ७७६२४ जालना–नांदेड DEMU दिनांक ३१ मे २०२६ रोजी रद्द राहील. गाडी क्रमांक ५७६५१ नांदेड–मनमाड पॅसेंजर दि. ३१ मे २०२६ रोजी रद्द राहील. गाडी क्रमांक ५७६५२ मनमाड–नांदेड पॅसेंजर दिनांक ०१ मे २०२६ रोजी रद्द राहील.

गाडी क्रमांक ७७६०६ नांदेडमेडचल अ‌ऎचण दिनांक ०१ जून २०२६ रोजी रद्द राहील, असे रेल्वे प्रशासनाने कळविले आहे.

**काही तांत्रिक कारणास्तव निझामाबाद गाडी दोन दिवस रद्द**

प्रवाशांना कळविण्यात येते की, दि. २४ मे २०२६ आणि ३१ मे २०२६ रोजी काही तांत्रिक कारणास्तव निझामाबाद DEMU गाडी दोन दिवस रद्द करण्यात येत आहेत. गाडी क्रमांक ७७६४५/७७६४६ निजामाबाद –नांदेड –निजामाबाद अ‌ऎचण दिनांक २४.०५.२०२६ रोजी रद्द राहील. गाडी क्रमांक ७७६४५/७७६४६ निजामाबाद –नांदेड –निजामाबाद DEMU दिनांक ३१.०५.२०२६ रोजी रद्द राहील.

# चंदेरी

# पन्नाशी उलटली तरी हे कलाकार अविवाहितच!

**आपल्या आवडत्या कलाकारांच्या नवनवीन चित्रपटांबरोबरच त्यांच्या खासगी आयुष्याबद्दल जाणून घेण्यासही प्रेक्षक उत्सुक असतात. गेल्या काही दिवसांपासून सलमान खान मोठ्या चर्चेत आहे. तो सध्या ६० वर्षांचा आहे. मात्र, अद्याप अविवाहित आहे. आतापर्यंत बॉलीवूडमधील अनेक अभिनेत्रींबरोबर त्याचे नाव जोडले गेले. यामध्ये संगीता बिजलानी, ऐश्वर्या राय, कतरीना कैफ या लोकप्रिय अभिनेत्रींबरोबर तो रिलेशनशिपमध्ये होता. मात्र, कोणत्या ना कोणत्या कारणाने त्याचे ब्रेकअप झाले. त्याच्या सगळ्याच रिलेशनशिपची मोठ्या प्रमाणात चर्चा झाली. सलमान खानबरोबर इंडस्ट्रीमध्ये असे अनेक कलाकार आहेत, ज्यांचे वय ५० हून अधिक आहे, तरीही अजूनही त्यांनी लग्न केले नाही. आता हे कलाकार कोणते आहेत, हे जाणून घेऊ...**






» तब्बू : बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री म्हणून तब्बूला ओळखले जाते. तब्बू विविध भूमिकांतून प्रेक्षकांच्या भेटीला येते. पण, तब्बूने आतापर्यंत लग्न केले नाही. विविध मुलाखतींमध्ये लग्न करण्याबद्दल अभिनेत्रीने तिचे मत सांगितले आहे. तब्बूच्या म्हणण्यानुसार, लग्न न करणे हा तिचा वैयक्तिक प्रश्न आहे आणि ती सिंगल असली तरी आनंदी आहे.



» अक्षय खन्ना : धुरंधर सिनेमा प्रदर्शित झाल्यानंतर ज्या अभिनेत्याची मोठ्या प्रमाणात चर्चा झाली, तो अभिनेता म्हणजे अक्षय खन्ना. अक्षय खन्ना ५१ वर्षांचा आहे. तो त्याच्या विविध भूमिकांमधून प्रेक्षकांची मने जिंकतो. त्याने एका मुलाखतीत स्पष्टपणे सांगितले होते, त्याला लग्न करायचे नाही. त्याला एकटे राहणे आवडते.

» अमिषा पटेल : गदर व कहो ना प्यार है या सिनेमांतून लोकप्रिय ठरलेली अभिनेत्री अमिषा पटेल ही आजही सिंगल आहे. तिचे वय ५१ वर्षांहून जास्त आहे.

» राहुल खन्ना : अक्षय खन्नाचा मोठा भाऊ राहुल खन्ना सध्या ५३ वर्षांचा आहे. तो त्याच्या स्टाइल आणि लूकमुळे लोकप्रिय आहे. मात्र, तोसुद्धा अक्षयप्रमाणेच अविवाहित आहे.

» उदय चोप्रा : धूम फेम अभिनेता व निर्माता उदय चोप्राचे वय ५३ इतके आहे. मात्र, आजही तो अविवाहित आहे.

» साजिद खान : दिग्दर्शक साजिद खान ५४ वर्षांचे आहे. मात्र, साजिद खाननेही लग्न केले नाही.

» सुष्मिता सेन : लोकप्रिय अभिनेत्री सुष्मिता सेनचे वय ५० वर्षे इतके आहे, तिनेही आतापर्यंत लग्न केले नाही. तिने दोन मुलींना दत्तक घेतले आहे.

# करण कुंद्रा लवकरच होणार महाराष्ट्राचा जावई!



**मालिका विश्वातील लोकप्रिय जोडी करण कुंद्रा आणि तेजस्वी प्रकाश यांनी त्यांच्या प्रेमाची जाहीर कबुली दिली आहे. अनेक वर्षे एकमेकांना डेट करत असलेले हे जोडपे लवकरच लग्न करणार असल्याचे समोर आले आहे. अनेक रिॲलिटी शोमध्ये एकत्र काम केलेल्या करण आणि तेजस्वीची जोडी अत्यंत लोकप्रिय आहे. आता करणने तेजस्वीला दुबईमध्ये खास स्टाइलमध्ये प्रपोज केले, याचे व्हिडीओ व्हायरल होत आहेत...**

करण कुंद्राने पंजाबी भाषेमध्ये बोलून तेजस्वीकडे त्याचे प्रेम व्यक्त केले. तो म्हणाला, की जेव्हा आपण भेटलो तेव्हा खूप गोष्टी घडत होत्या. जेव्हा बिग बॉसच्या घरातून बाहेर आलो तेव्हा बाहेर यांचे प्रेम दोन आठवडेसुद्धा टिकणार नाही असे म्हटले गेले. काहीजण हे प्रेम खोटं आहे, आपण खोटे आहोत असेदेखील म्हणाले; मात्र आता आपल्या नात्याला चार वर्षे पूर्ण झाली असून आपण एकमेकांची साथ देत आहोत. अनेक गोष्टींना एकत्र सामोरे गेलो, असे म्हणत करणने त्याच्या भावना व्यक्त केल्या. यानंतर अंगठी बाहेर काढून आणि गुडघ्यावर बसून करण कुंद्राने तेजस्वी प्रकाशला लग्नासाठी विचारले. तेजस्वीने लगेच होकार दिला. प्रपोज करताना करणने तिला खास डायमंड रिंग घातली. प्रेमाची कबुली दिल्यानंतर तेजस्वी प्रकाश भावनिक झालेली दिसून आली. ते आता लवकरच लग्नबंधनामध्ये अडकणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## सलमान खानच्या 'मातृभूमी'चं पुन्हा शूटिंग?

अनेक दिवसांपासून सलमान खानच्या 'मातृभूमी : मे वॉर रेस्ट इन पीस' या सिनेमाची मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू आहे. हा सिनेमा कधी प्रदर्शित होणार, याची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत. निर्मात्यांनी याआधी सिनेमा १७ एप्रिलला प्रदर्शित होणार असल्याचे सांगितले होते. मात्र, त्यानंतर प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलण्यात आली. विशेष म्हणजे, भारत-चीन संघर्षावर आधारित अनेक चित्रपटांची अशीच अवस्था झाल्याचे दिसून येते. काही रिपोर्टनुसार, चित्रपटाच्या काही भागांचे पुन्हा शुटिंग केले जात आहे. सुरुवातीला या सिनेमाचे नाव बॅटल ऑफ गलवान असे होते. त्यानंतर १६ मार्चला सिनेमाचे नाव बदलण्यात आले. आता याचे नाव मातृभूमी मे वॉर रेस्ट इन पीस असे आहे. हा चित्रपट १४ ऑगस्ट होणार असल्याचे म्हटले जात आहे. निर्मात्यांनी याबद्दल कोणतीही अधिकृत घोषणा केली नाही.

## अभिनेत्री मेधा शंकरची विशेष मुलाखत

# अस्सलपणातच शक्ती, मला अस्सलच राहायचंय!; मी जशी आहे तशीच अप्रतिम

**१२वी फेल चित्रपटाची अभिनेत्री मेधा शंकरच्या अभिनयाचे समीक्षकांनी कौतुक केले. ती अलीकडेच 'गिन्नी वेड्स सनी २' या रोमँटिक कॉमेडी चित्रपटात मुख्य भूमिकेत दिसली आहे. खास मुलाखतीत आम्ही तिच्या चित्रपट प्रवासासह, सध्याची संस्कृती, लग्न आणि जोडीदाराविषयीच्या अपेक्षांबद्दल चर्चा केली...**

प्रश्न : मुलींना अनेकदा त्यांच्या कपड्यांवरून आणि बिनधास्त ॲटिट्यूडवरून पारखले जाते. जसे चित्रपटातील गिन्नीच्या बाबतीत घडते. जेव्हा तू अभिनयाला करिअर म्हणून निवडले, तेव्हा घरातून काय प्रतिक्रिया होती? काही ठरलेले निकष होते का?

» मेधा : मी अभ्यासात हुशार होते. माझे वडील म्हणायचे, अगं, जे अभ्यासात कच्चे असतात तेच अभिनेते बनतात. तुला अभिनेत्री का व्हायचे आहे? मला चांगला रँक मिळाल्यामुळे पदव्युत्तर पदवी घ्यावी लागली. त्यानंतर माझ्या वडिलांना वाटत होते की मी नोकरी करावी, पण जेव्हा मी बॉलीवूडमध्ये येण्याचा विचार केला, तेव्हा त्यांचा पूर्णपणे विरोध होता. जेव्हा तुम्ही बाहेरून येता, तेव्हा इंडस्ट्रीबद्दलची लोकांची धारणा फारशी चांगली नसते. प्रत्येकाला वाटतं की इथे नक्कीच काहीतरी घाणेरडं असेल, पण जेव्हा तुम्ही जवळ जाता, तेव्हा तुमच्या लक्षात येतं, अरे, लोक असं का म्हणत आहेत? ते इतकं वाईट नाहीये. मात्र, माझी आई आणि भाऊ यांनी खूप पाठिंबा दिला. आता बाबांचा विचारही खूप बदलला आहे.

> जेव्हा माझी पहिली वेब सिरीज 'बीचम हाऊस' प्रदर्शित झाली, तेव्हा बाबांची प्रतिक्रिया होती, छान आहे की तू शोमध्ये साडीऐवजी सूट घातला आहेस. त्यात कोणतेही छोटे ड्रेस नाहीत याचा त्यांना आनंद झाला होता, पण आता ते कथेबद्दल आणि पात्राबद्दलही विचारतात. आज बाबा माझा सर्वात मोठा आधारस्तंभ आहेत. त्यांच्या पाठिंब्याशिवाय मी कदाचित या टप्प्यावर पोहोचले नसते.
>
> **-मेधा शंकर, अभिनेत्री**



प्रश्न : आजकाल असंही म्हटलं जातं की सेटपेक्षा जास्त अभिनय बाहेर करावा लागतो. स्व-प्रसिद्धी, पापाराझी संस्कृती इत्यादींबाबत तुझा अनुभव कसा राहिला आहे?

» मेधा : जेव्हा '१२ वी फेल' इतका प्रचंड हिट झाला, तेव्हा माझ्याकडे कोणताही पीआर (जनसंपर्क) किंवा एजन्सी नव्हती. तेव्हा ते प्रेम कुठून आलं हे मला माहीत नाही, पण मला ते खूप आवडलं. माझ्या आयुष्यातील एक मंत्र आहे की अस्सलपणातच शक्ती आहे आणि मला अस्सलच राहायचं आहे. माझा विश्वास आहे की मी जशी आहे तशीच अप्रतिम आहे. मला दुसरं कोणीतरी बनण्याची गरज नाही. लोक म्हणतात की मला तसं करावं लागेल. कोणीतरी मला सांगितलं की मला अधिक लोकांसमोर यायला हवं. 'दृश्यमानता' हा खूप मोठा शब्द आहे आणि माझी प्रतिक्रिया होती, 'दृश्यमानता कुठे आहे?' त्यांनी मला सांगितले की लोक रील्सच्या युगात आहेत आणि ते विसरून जातात. मात्र मी फक्त तेव्हाच दिसते जेव्हा माझे फोटो एखाद्या रेस्टॉरंट, जिम किंवा कार्यक्रमातून बाहेर पडताना काढले जातात. मला समजते की सेलिब्रिटी असण्याचा हा एक मोठा भाग आहे, पण मला जे योग्य वाटते तेच मी करतो.



प्रश्न : एक मुलगी म्हणून तुला लग्नाबाबत दबाव होता किंवा आहे का?

» मेधा : नाही, तसं काही नव्हतं. पण १२ वी फेल चित्रपटापूर्वी नातेवाईक विचारायचे, तू लग्न कधी करणार आहेस? पण जोपर्यंत माझे वडील मला सांगत नसत, तोपर्यंत मी या गोष्टी कधीच गांभीर्याने घेतल्या नाहीत आणि मला त्यांच्याकडून अजूनपर्यंत असा कोणताही दबाव जाणवला नाही. माझ्या वडिलांचा विचार आहे की, चांगली व्यक्ती भेटली तरच लग्न करायला हवं. घाईघाईने चुकीच्या व्यक्तीशी लग्न होऊ नये, याची त्यांना जास्त काळजी असते.

प्रश्न : तुझ्या जोडीदारामध्ये कोणते गुण असणे आवश्यक आहे? तुझ्या मते प्रेमसंबंधात रेड फ्लॅग्स आणि ग्रीन फ्लॅग्स कोणते आहेत?

» मेधा : माझ्या मते कोणाबद्दलही पूर्णपणे हिरवा किंवा लाल इशारा नसतो. जेव्हा तुम्ही कोणावर प्रेम करता, तेव्हा त्यांच्यात काही सामर्थ्ये आणि काही कमकुवतपणा असतो. तुम्हाला ते दोन्ही स्वीकारून त्यांच्यावर प्रेम करावे लागते. कोणत्याही नात्यात, आपण काही संघर्षानंतरच एकत्र येतो. तुम्ही एकमेकांमध्ये अगदी चपखल बसताच असे नाही. हो, हे आवश्यक आहे की त्या व्यक्तीमध्ये तीव्रतेने प्रेम करण्याची क्षमता आणि नाते टिकवून ठेवण्याची ताकद असावी. माझा विश्वास आहे की प्रेमात पडणे सोपे आहे, पण आजच्या काळात ते नाते टिकवून ठेवण्याची ताकद खूप दुर्मिळ आहे. आजकाल आपण खूप लवकर हार मानतो. शिवाय, पुरुषांमधील भावनिक परिपक्वता मला खूप आकर्षित करते. निष्ठा आणि त्यासारख्या गोष्टी खूप मूलभूत आहेत, ज्यांचा उल्लेख करण्याचीही गरज नाही.

**सैफ अली खानची विशेष मुलाखत**

# आपण माणसे आहोत, उणिवा अपरिहार्य... हेतू शुद्ध असावा!



**'हम तुम' आणि 'दिल चाहता है'मधील शहरी आणि खेळकर प्रियकरापासून ते 'ओमकारा'मधील धूर्त लंगडा त्यागी आणि 'तानाजी'मधील निर्दयी खलनायकापर्यंत. 'कल हो ना हो' मधील मनमोहक रोहितपासून ते 'सेक्रेड गेम्स' मधील गंभीर सरताज सिंगपर्यंत, सैफ अली खानने आपल्या ३३ वर्षांच्या कारकिर्दीत स्वतःला एक अष्टपैलू अभिनेता म्हणून सिद्ध केले आहे. तो सध्या त्याच्या नवीन नेटफ्लिक्स चित्रपट 'कर्तव्य'मधील एका समर्पित, अस्सल हरियाणवी पोलिसाच्या भूमिकेमुळे चर्चेत आहे. त्याची विशेष मुलाखत...**

## मी मुलांना कठोर परिश्रम करण्यासाठी प्रोत्साहित करतो...

सैफची मुले सारा आणि इब्राहिम अली खान यांनीही अभिनयाच्या जगात प्रवेश केला आहे. ही भावी पिढी आपला अभिनयाचा वारसा पुढे नेत आहे याबद्दल तो म्हणाला, की एक वडील म्हणून, मला खूप आनंद आहे की त्यांना काम करायचे आहे. मी त्यांना पूर्णपणे पाठिंबा देतो. मी त्यांना कठोर परिश्रम करण्यासाठी प्रोत्साहित करतो. मी त्यांना स्वतःवर काम करायला शिकवतो. कारण सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे सतत पुढे जात राहणे, प्रयत्न करत राहणे आणि स्वतःमध्ये सुधारणा करत राहणे, जसे आपण सर्व करतो. त्यांच्या भविष्याबद्दल काळजी वाटते का, असे विचारल्यावर तो म्हणाला, की नक्कीच. प्रत्येक पालकाला आपल्या मुलांच्या भविष्याची आणि त्यांच्या आनंदाची काळजी असते. मुलगा, पती, वडील आणि अभिनेता अशा विविध भूमिका साकारताना, त्याला असे वाटते का की तो आपली कोणतीही कर्तव्ये योग्यरित्या पार पाडू शकत नाही? या प्रश्नावर तो म्हणाला, की नेहमीच. आपण आपल्या जबाबदाऱ्या चांगल्या प्रकारे पार पाडण्याचा नेहमीच प्रयत्न करतो, परंतु आपण कोणत्याही भूमिकेत कधीच परिपूर्ण नसतो. आपण माणसे आहोत, त्यामुळे उणिवा अपरिहार्य आहेत. महत्त्वाची गोष्ट ही आहे की, तुमच्या सर्व भूमिका चांगल्या प्रकारे पार पाडण्याचा तुमचा हेतू असावा.

## 'ओमकारा' खूप खास होता...

'कर्तव्य'मधील टिपिकल हरियाणवी पोलीस असो किंवा 'ओमकारा'मधील देशी लंगडा त्यागी असो, सैफचा अभिनय अशा भूमिकांमध्येच सर्वात जास्त चमकतो, जरी त्याचा या जगाशी वैयक्तिकरित्या काहीही संबंध नसला तरी. अशा भूमिका साकारण्याच्या आपल्या पद्धतीबद्दल तो सांगतो, 'हे माझ्यासाठी थोडे अवघड आहे. विशेषतः सामाजिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीशी संबंधित लहान बारकावे. उदाहरणार्थ, लंगडा त्यागीची देहबोली, जसे की त्याचे जोरात डोके खाजवणे, माझ्यापेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. मी कधीही तसे डोके खाजवणार नाही (हसतो). त्याची शैली बरीच वेगळी आहे, पण त्यातच मजा आहे, की अशी व्यक्ती अस्तित्वात असू शकते हे जाणून घेणे. एक अभिनेता म्हणून, या गोष्टी मनोरंजक आहेत.' 'ओमकारा'मधील आपल्या अनुभवाबद्दल सांगताना तो म्हणतो, की हा एक खूप खास चित्रपट होता. प्रत्येकाचा उत्साह वेगळा होता. विशाल भारद्वाज (दिग्दर्शक) यांनी नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा (एनएसडी) मधील कलाकारांना आणि मुख्य प्रवाहातील व्यावसायिक चित्रपटांतील कलाकारांना एका छताखाली एकत्र आणले, जो एक अद्भुत अनुभव होता. आम्ही सर्वजण एकमेकांकडून खूप काही शिकलो. एका अर्थाने, ती एक अद्भुत कार्यशाळा होती. मला कोंकणा सेन शर्मासोबत काम करायला खूप मजा आली आणि ती एक अप्रतिम कलाकार आहे.

## चुकूनही पोलिसाची भूमिका साकारू नकोस...

ही घटना सैफच्या सुरुवातीच्या हिट चित्रपट 'मैं खिलाडी तू अनाडी' (१९९४) मधील आहे. जेव्हा मी 'मैं खिलाडी तू अनाडी' चित्रपट केला, तेव्हा माझ्या दिग्दर्शकाने, जो माझा मित्रही आहे, मला सांगितले होते की चुकूनही पोलिसाची भूमिका साकारू नकोस... हा एक विनोदी चित्रपट आहे, त्यामुळे तो चालेल, पण सध्या तुला एका गंभीर पोलिसाची भूमिका साकारता येणार नाही. आता मला स्वतःचा अभिमान आहे की २०-२५ वर्षांनंतर मी एका पोलिसाची भूमिका साकारू शकलो (हसतो). या चित्रपटात पवन ज्या दबावाखाली आपलं कर्तव्य बजावतो, ज्या प्रकारे तो आपल्या समस्यांवर उपाय शोधतो, ते सोपं नाही. त्याचं तत्त्वज्ञानही रंजक आहे. तो खरंतर एक नायक आहे.

## इरफान भाई महान अभिनेत्यांपैकी एक...

अलीकडेच सोशल मीडियावर एक पोस्ट व्हायरल झाली होती, ज्यात असा दावा करण्यात आला होता की लंगडा त्यागीच्या भूमिकेसाठी दिवंगत इरफान खान ही पहिली पसंती होती. यावर अनेकांनी प्रतिक्रिया दिली, की इरफान खान निश्चितच एक उत्कृष्ट अभिनेते होते, पण सैफने लंगडा त्यागीच्या भूमिकेत जीव ओतला. यावर सैफने उत्तर दिले, 'हे अविश्वसनीय आहे. इरफान भाई आमच्या पिढीतील महान अभिनेत्यांपैकी एक आहेत. मला 'ओमकारा'सारखा चित्रपट आणि लंगडा त्यागीसारखी भूमिका मिळाली, हे माझे भाग्य आहे आणि मी ती केली. अनेक दिग्दर्शकांनी मला अशा विविध भूमिकांमध्ये घेतले आहे, ज्या भूमिकांमध्ये मी यापूर्वी कधीच दिसलो नव्हतो. इरफान भाईंनी ती भूमिका केली असती, तर त्यांनी शंभर पटीने चांगले काम केले असते.

# चीनच्या कोळसा खाणीत झालेल्या भीषण स्फोटात ९० जणांचा मृत्यू

**बिजींग (वृत्तसंस्था) –** चीनच्या शांक्सी प्रांतातील एका कोळसा खाणीत झालेल्या भीषण स्फोटात किमान ९० जणांचा मृत्यू झाला. गेल्या दशकातील चीनमधील ही सर्वात भीषण कोळसा खाण दुर्घटना असल्याचे मानले जात आहे. वृत्तसंस्था शिन्हुआच्या माहितीनुसार, हा स्फोट शुक्रवारी बीजिंगपासून सुमारे ५२० किलोमीटर नैऋत्येस असलेल्या शांक्सी प्रांतातील किनयुआन काउंटीमध्ये झाला. अपघातापूर्वी खाणीत कार्बन मोनॉक्साईड वायूचा इशारा देण्यात आला होता, त्यानंतर थोड्याच वेळात मोठा स्फोट झाला. स्फोटाच्या वेळी खाणीत २४७ कामगार काम करत होते. अजून किती जण आत अडकले आहेत हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. मदत आणि बचाव कार्य सुरू आहे.

शिन्हुआने सुरुवातीला केवळ आठ जणांच्या मृत्यूची बातमी दिली होती आणि २०० हून अधिक कामगारांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आल्याचे म्हटले होते. नंतर, मृतांचा आकडा अचानक ८२ पर्यंत वाढला. हा आकडा इतक्या झपाट्याने कसा वाढला याचे स्पष्टीकरण शासकीय माध्यमांनी दिले नाही. अपघातानंतर, चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी बचाव पथकांना बेपत्ता झालेल्यांना शोधण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे निर्देश दिले आहेत. अपघातास जबाबदार असलेल्यांना सोडले जाणार नाही, असे त्यांनी सांगितले.



खाणीतील कार्बन मोनॉक्साईडची पातळी लक्षणीयरीत्या वाढली होती. यामुळेच स्फोट झाला असावा, असा अंदाज आहे. अपघाताच्या नेमक्या कारणाचा सध्या तपास सुरू आहे. जिनपिंग म्हणाले की, सर्व क्षेत्रांनी आणि सरकारी विभागांनी या अपघातातून धडा घ्यावा, कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेबाबत सतर्क राहावे आणि मोठे अपघात टाळण्यासाठी धोक्यांचा सखोल तपास करावा. ते असेही म्हणाले की, चीनमध्ये पावसाळा सुरू झाल्यामुळे पूर प्रतिबंध आणि आपत्ती व्यवस्थापनाकडे विशेष लक्ष देणे महत्त्वाचे आहे.

जिनपिंग यांनी चीनच्या स्टेट कौन्सिलच्या सुरक्षा विभागाला स्थानिक अधिकाऱ्यांना त्यांच्या जबाबदाऱ्यांची आठवण करून देण्याचे निर्देशही दिले. प्रत्येक अपघाताचा सखोल तपास व्हावा आणि भविष्यात असे अपघात कोणत्याही परिस्थितीत टाळले जावेत, असे निर्देश त्यांनी दिले. चीनचे पंतप्रधान ली केकियांग यांनी असेही सांगितले की, बेपत्ता कामगारांना शोधण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले पाहिजेत. त्यांनी अपघाताच्या कारणांची त्वरित चौकशी करून जबाबदार लोकांवर कारवाई करण्याची मागणी केली.

चीनने अलिकडच्या वर्षांत खाण सुरक्षा नियम अधिक कडक केले आहेत, तरीही खाण अपघात घडतच आहेत. कोळसा उत्पादन वाढवण्याचा दबाव आणि ढिसाळ सुरक्षा मानके ही अनेकदा प्रमुख कारणे म्हणून सांगितली जातात. यापूर्वी, फेब्रुवारी २०२३ मध्ये, इनर मंगोलियाच्या शिनजियांग प्रदेशातील एका खुल्या खाणीत भूस्खलन झाले होते, ज्यात ५३ कामगारांचा मृत्यू झाला होता.

शांक्सी प्रांत हा चीनचा सर्वात मोठा कोळसा-उत्पादक प्रदेश मानला जातो. देशाच्या ऊर्जेच्या गरजांचा मोठा भाग येथील खाणींमधून पूर्ण होतो. तथापि, सततच्या उत्पादनाच्या दबावामुळे सुरक्षेबद्दल प्रश्न निर्माण झाले आहेत. गेल्या महिन्यात, शांक्सीच्या लुलियांग परिसरात झालेल्या खाण दुर्घटनेत चार कामगार ठार झाले. या ताज्या स्फोटामुळे चीनच्या खाण सुरक्षा प्रणालीवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. चीन ऊर्जेसाठी कोळशाचा मोठ्या प्रमाणावर वापर करत असून, तो देशाच्या निम्म्याहून अधिक ऊर्जेची गरज भागवतो.

# पद्मश्री महेंद्र कपूर पुरस्कारांचे वितरण

**मुंबई (प्रतिनिधी) –** सामाजिक, सांस्कृतिक, कला आणि क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल दिल्या जाणाऱ्या 'पद्मश्री महेंद्र कपूर पुरस्कार' तसेच विविध मानाच्या पुरस्कारांचे वितरण प्रभादेवी येथील रवींद्र नाट्य मंदिर येथे उत्साहपूर्ण वातावरणात झाले. इंटरनॅशनल थिएटर अँड स्पोर्ट्स फाउंडेशन आणि साईदिशा प्रतिष्ठान मार्फत या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.



समाजसेवक दत्तात्रय बाळकृष्ण माने यांच्या पुढाकारातून आयोजित या कार्यक्रमाला कला, क्रीडा, सामाजिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. अभिनेते बोमन इराणी यांना अभिनय क्षेत्रातील योगदानासाठी 'पद्मश्री महेंद्र कपूर पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह आणि मुंबई पोलीस दलातील उप आयुक्त बजरंग बनसोडे यांना 'रणझुंजार पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र राज्य चित्रपट, रंगमंच आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील आणि एसआरएचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेंद्र कल्याणकर यांना 'सेवा रत्न पुरस्कार' देण्यात आला.

'महाराष्ट्र आयकॉन पुरस्कार' संतोष लक्ष्मण जाधव, डॉ.सायली पालखेडकर, क्रिकेटपटू आयुष म्हात्रे, डॉ. मंजू मंगल प्रभात लोढा यांना प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ गायक सुरेश वाडकर यांना आयटीएसएफचा जीवन गौरव पुरस्कार यांना प्रदान करण्यात आला. 'ज्वेल ऑफ इंडिया अवॉर्ड' क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकर यांना प्रदान करण्यात आला. गायक हर्षद गोळेकर आणि दुहिता गोळेकर, शहजाद अली यांना पद्मश्री महेंद्र कपूर पुरस्कार देण्यात आला. रायझिंग स्टार अवॉर्ड गायक जेटशेन लामा, गायक देवानश्रीया के. यांना देण्यात आला. कला रत्न पुरस्काराने चित्रकार शेखर साने यांना गौरवण्यात आले. सुहाना ग्रुपचे विशाल चोरडिया यांना 'उद्योग रत्न' पुरस्कार देण्यात आले.

पुरस्कार वितरण सोहळ्यात कालीपुत्र कलिचरण महाराज यांनी शिवस्रोत पठण केले. घाटकोपर येथील विशेष मुलांनी विशेष सादरीकरण केले. विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा सन्मान मुंबईकर प्रेक्षकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरल्याचे साईदिशा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष दत्तात्रय माने यांनी सांगितले.

# दिल्ली हायकोर्टाची विनेश फोगाटला आशियाई क्रीडा स्पर्धेच्या चाचण्यांमध्ये सहभागी होण्याची परवानगी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी) –** दिल्ली उच्च न्यायालयाने भारतीय महिला कुस्तीपटू विनेश फोगाटच्या बाबतीत सुरू असलेल्या वादात मोठा दिलासा दिला आहे. न्यायालयाने तिला आगामी आशियाई क्रीडा स्पर्धेच्या निवड चाचण्यांमध्ये सहभागी होण्याची परवानगी दिली आहे. यापूर्वी शुक्रवारी, न्यायालयाने भारतीय कुस्ती महासंघाच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली होती आणि म्हटले होते की, क्रीडा संघटनांनी सूडबुद्धीने नव्हे, तर खेळाडू आणि खेळाच्या सर्वोत्तम हितासाठी काम केले पाहिजे.



सरन्यायाधीश डी. के. उपाध्याय आणि न्यायमूर्ती तेजस कारिया यांच्या खंडपीठाने केंद्र सरकारला विनेश फोगटच्या तंदुरुस्तीचे मूल्यांकन करण्यासाठी तज्ज्ञांची समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले. याच्या आधारावर, तिला ३०-३१ मे रोजी होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेच्या निवड चाचण्यांमध्ये सहभागी होण्याची परवानगी दिली जाईल.

सुनावणीदरम्यान, न्यायालयाने तोंडी टिप्पणी केली की देशात मातृत्वाचा आदर केला जातो आणि त्याचा वापर खेळाडूच्या कारकिर्दीच्या विरोधात केला जाऊ नये. न्यायालयाने म्हटले, मातृत्व हा एक उत्सव आहे. कोणत्याही खेळाडूसाठी ते हानिकारक ठरू नये. वास्तविक पाहता, विनेश फोगाट जुलै २०२५ मध्ये आई झाली आणि आता देशांतर्गत स्पर्धांमध्ये पुनरागमन करण्याची तयारी करत आहे.भारतीय कुस्ती महासंघाने नुकतेच विनेश फोगाटला २६ जून २०२६ पर्यंत देशांतर्गत स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी अपात्र घोषित केले आहे. महासंघाने असा युक्तिवाद केला की, युनायटेड वर्ल्ड रेसलिंगच्या उत्तेजक-विरोधी नियमांनुसार, निवृत्तीनंतर पुनरागमन करणाऱ्या कोणत्याही खेळाडूने किमान सहा महिन्यांची पूर्वसूचना देणे आवश्यक आहे. डब्ल्यूएफआयच्या मते, विनेशने ही अनिवार्य पूर्वसूचना पूर्ण केली नाही, ज्यामुळे ती देशांतर्गत स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी अपात्र ठरली आहे.

विनेशला बजावलेल्या १५-पानांच्या कारणे दाखवा नोटीसमध्ये, डब्ल्यूएफआयने तिच्यावर बेशिस्त आणि उत्तेजक-विरोधी नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप केला आहे. या नोटीसमध्ये असेही म्हटले आहे की तिच्या वर्तनाने भारतीय कुस्तीच्या प्रतिमेला धक्का पोहोचला आहे. सुनावणीदरम्यान, विनेशचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वरिष्ठ वकिलाने न्यायालयाला सांगितले की, ९ मे रोजीची नोटीस, ज्यात तिच्या पॅरिस ऑलिम्पिकमधील अपात्रतेला 'राष्ट्रीय लाजिरवाणी गोष्ट' म्हटले होते, ती पूर्वग्रहदूषित आणि अपमानजनक होती. खंडपीठाने तीव्र शब्दांत टिप्पणी केली, एखादा राग किंवा वाद असेल तर खेळाचा बळी का द्यायचा? विनेश एक आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू आहे. आई झाल्यानंतर अवघ्या १० महिन्यांत तिला चाचण्यांमधून वगळण्याचे काय समर्थन आहे?

यापूर्वी, १८ मे रोजी, उच्च न्यायालयाच्या एकल खंडपीठाने विनेशलातात्काळ दिलासा देण्यास नकार दिला होता. तिने या निर्णयाविरोधात द्विसदस्यीय खंडपीठात अपील केले होते, ज्याने आता हा निर्णय दिला आहे.

## आदर्श आचारसंहितेतील प्रस्ताव छाननी समितीमार्फतच सादर करावेत

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) –** भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांनी १८ मे २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार महाराष्ट्र विधान परिषद स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या द्वैवार्षिक निवडणुकीची घोषणा करण्यात आली आहे.

या निवडणूक कार्यक्रमात छत्रपती संभाजीनगर विभागातील नांदेड, उस्मानाबाद-बीड-लातूर, परभणी-हिंगोली तसेच औरंगाबाद-जालना या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांचा समावेश असून संबंधित मतदारसंघांमध्ये तात्काळ प्रभावाने आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे.

शासन परिपत्रकानुसार, आदर्श आचारसंहितेच्या कालावधीत एखाद्या प्रस्तावास मान्यता देणे अथवा कार्यवाही करण्याबाबत संबंधित विभाग अथवा कार्यालय आग्रही असल्यास, अशा प्रस्तावांबाबत मार्गदर्शन किंवा आचारसंहितेमधून सूट मिळण्यासाठीचे प्रस्ताव थेट भारत निवडणूक आयोग किंवा मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडे पाठवू नयेत. हे प्रस्ताव तपासणीसाठी महाराष्ट्र शासन मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत छाननी समितीमार्फतच सादर करावेत, असे निर्देश देण्यात आले आहेत.

सदर सूचना सर्व अधिनस्त कार्यालय प्रमुखांच्या निर्दर्शनास आणून देऊन त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत दक्षता घ्यावी, असे आवाहन विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर प्रशासनाने केले आहे.

# आळंदीत माऊलींच्या दानपेटीवर डल्ला

## सेवेकऱ्याच्या घरून पावणे चार लाखांची रोकड जप्त

**पुणे (प्रतिनिधी) –** देवाच्या आळंदीतील माऊलींच्या दानपेटीवर सेवेकऱ्याने डल्ला मारला. त्या विशाल वारुळे नामक सेवेकऱ्याच्या घरात रोकड सापडली आहे. १०, २०, ५० आणि शंभर रुपयांच्या नोटांनी भरलेल्या पिशव्यांमध्ये तब्बल पावणे चार लाख रुपये जप्त करण्यात आलेत. दानपेटीतील रक्कम जमा करताना विशाल हातचलाखी करायचा आणि एका पिशवीमध्ये नोटा भरायचा. गेल्या तीन महिन्यांपासून त्याचा हा उद्योग सुरु होता, असा अंदाज वर्तवला जातोय. ज्या दिवशी नोटांनी भरलेली पिशवी घरी घेऊन जायचा, त्या दिवशी विशाल मंदिरातील काही हार घरी घेऊन जातो. असं म्हणायचा आणि पिशवीत हार दिसतील असे ठेवायचा, खाली मात्र रोकड असायची. घरी आल्यावर रोकड मोजायचा आणि नंतर ती पिशवी आहे तशी बेडमध्ये ठेऊन द्यायचा. त्याचं पिशव्यांमध्ये पावणे तीन लाखांची ही रोकड आढळली. गेल्या तीन महिन्यांपासून तो दानपेटीतील रक्कम जमा करणे आणि ती मोजून ठेवणे, हे काम करत होता.





विशाल वर्षभरापूर्वी मंदिरात आला, तिथं भोजनालायतील आचाऱ्याला भेटला. मी जुन्नर तालुक्यातील वारुळेवाडी गावातून आलोय, माझा केटरिंगचा व्यवसाय आहे. मला माऊलींची सेवा करायची आहे, मला अन्नदान छत्रातून सेवा करण्याची संधी द्या. असं म्हणून त्याने सर्वप्रथम आचाऱ्याला विश्वासात घेतलं. इथं तो भाविक-भक्तांना सेवा द्यायला लागला. पाच-सहा दिवस तो इथं काम करायचा आणि मध्येचं गायब व्हायचा. परत काही दिवसांनी यायचा आणि मंदिरात सेवा द्यायचा. ही सेवा देता-देता त्याने इतर सेवेकारांच्या मदतीने मंदिरातील अनेकांशी ओळख निर्माण केली. पाच-सहा महिन्यांपूर्वी त्याने मंदिरातील कॅशियरशी जवळीक वाढवायला सुरुवात केली. कॅशियरची कामं ऐकू लागला. स्वतः किती प्रामाणिक आहे, हे दिसेल अशी कृती करु लागला. कॅशियरची इतर कामं हलकी होऊ लागली. अशा रीतीने हळूहळू कॅशियरच्या मनात स्वतःबद्दल विश्वास निर्माण करण्यात तो यशस्वी ठरला. मग तीन महिन्यांपूर्वी कॅशियरने त्याला दानपेटीतील रक्कम जमा करण्याच्या कामात दाखल करुन घेतलं. अलीकडच्या काही दिवसांपासून कॅशियर, सुरक्षारक्षक आणि सेवेकरी म्हणून विशाल असे तिघेचं दानपेटी खोलायचे.

अनेक दानपेट्या असल्यानं प्रत्येकावर वेगवेगळ्या दानपेट्या खोलण्याची आणि रक्कम जमा करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. विशालला जे अपेक्षित होतं, ते घडू लागलं. मग गेल्या वर्षभरात विशालने जो विश्वास निर्माण केला होता, त्याचा गैरफायदा घ्यायला त्याने सुरुवात केली. दानपेटी खोलली की बादलीत रक्कम भरता-भरता तो काही रक्कम त्याने आणलेल्या पिशवीत भरु लागला. कॅशियरकडे बादली सोपवणे आणि सर्व रक्कम जमा करुन होईपर्यंत तो पिशवीत भरलेली रक्कम घरी घेऊन जायचं नियोजन करायचा. यासाठी मंदिरातील काही हार घरी घेऊन जातो, असा बहाणा तो करायचा. ते हार पिशवीत दिसतील असे ठेवायचा, खाली मात्र रोकड असायची. ही हातचलाखी तो गेल्या काही दिवसांपासून करत राहिला.

तीन-चार दिवसांपूर्वी मात्र सीसीटीव्हीच्या स्क्रिनसमोर बसलेल्या कर्मचाऱ्याला त्याच्या हालचालींवरील संशय आला. मग त्याने दोन दिवस निरखून पाहिले, ही बाब देवस्थानच्या कानावर घातली. देवस्थानने पोलिसांकडे तक्रार केली. पोलिसांनी तपासाची चक्र हलवली आणि विशालचे बिंग फुटले. आजवर त्याने ज्या पिशव्यांमध्ये रक्कम चोरुन नेहली, त्या सर्व पिशव्या रोकडसह जप्त करण्यात आल्या. ती रोकड मोजली असता पावणे चार लाख रुपये आढळले आहेत. बरीचं रक्कम त्याने खर्च ही केलीये, काही ठिकामी रक्कम गुंतवल्याची चर्चा ही सुरुये. जुन्नर तालुक्यात त्याने असे काही उद्योग केल्याचं बोललं जातंय. या सर्व अनुषंगाने आळंदी पोलिसांनी तपासाची चक्र हलवली आहेत.

# एव्हरेस्ट शिखर उतरताना दोन भारतीय गिर्यारोहकांचा दुर्दैवी अंत

**नवी दिल्ली (प्रतिनिधी) –** जगातील सर्वोच्च शिखर असलेल्या माऊंट एव्हरेस्टवरून यशस्वी चढाई करून खाली उतरताना दोन भारतीय गिर्यारोहकांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. अरुण कुमार तिवारी आणि संदीप आरे अशी या मृत गिर्यारोहकांची नावे आहेत. एव्हरेस्ट शिखर सर केल्यानंतर खाली उतरत असताना अचानक या दोघांची प्रकृती खालावली आणि त्यातच त्यांचा अंत झाला.

शेर्पा मार्गदर्शकांनी या दोन्ही गिर्यारोहकांचे प्राण वाचवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली; मात्र दुर्दैवाने त्यांना यश आले नाही. या



घटनेमुळे यंदाच्या गिर्यारोहण हंगामात एव्हरेस्टवर मृत्युमुखी पडलेल्यांची एकूण संख्या आता पाचवर पोहोचली आहे. यापूर्वी, तीन नेपाळी गिर्यारोहकांचा येथे मृत्यू झाला होता. संदीप आरे यांनी बुधवारी तर अरुण तिवारी यांनी गुरुवारी एव्हरेस्टवर यशस्वी चढाई केली होती, अशी माहिती 'नेपाळ एक्स्पिडिशन ऑपरेटर्स असोसिएशन'चे ऋषी भंडारी यांनी दिली. बुधवारी संदीप आरे यांच्यासह तीन भारतीय आणि एकूण २७४ गिर्यारोहकांनी ८,८४८.८६ मीटर उंचीचे एव्हरेस्ट शिखर सर केले होते. एव्हरेस्टच्या इतिहासातील एकाच दिवसात झालेली ही आतापर्यंतची सर्वात मोठी विक्रमी चढाई मानली जात आहे. या ऐतिहासिक मोहिमेत संदीप आरे यांच्यासोबत तुलसी रेड्डी पालपुनुरी आणि अजय पाल सिंह धालीवाल हे भारतीय गिर्यारोहकही सहभागी होते.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी सायंकाळी शिखर सर करून खाली उतरत असताना अरुण कुमार तिवारी यांची प्रकृती 'हिलरी स्टेप' जवळ अचानक बिघडली. यावेळी चार शेर्पा गिर्यारोहकांनी तातडीने त्यांना मदत करण्याचा प्रयत्न केला, मात्र अत्यंत प्रतिकूल हवामानामुळे त्यांना वाचवता आले नाही. दुसरीकडे, संदीप आरे यांनी बुधवारीच शिखर सर केले होते. परंतु, खाली उतरताना त्यांची प्रकृती वेगाने खालावू लागली. शेर्पा मार्गदर्शकांनी त्यांना 'साउथ समिट'वरून अतिशय शिताफीने व सुखरूपपणे खाली आणले; मात्र, शुक्रवारी पहाटे 'कॅम्प-२' वर पोहोचल्यानंतर काही वेळातच त्यांची प्राणज्योत मालवली. सध्या दोन्ही मृत गिर्यारोहकांचे मृतदेह पुढील प्रक्रियेसाठी काठमांडू येथे आणण्याचे प्रयत्न युद्धपातळीवर सुरू आहेत.

## एकल महिलांसाठी राज्य सरकार आणणार धोरण

**मुंबई (प्रतिनिधी) –** राज्यातील एकल महिलांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक व कायदेविषयक प्रश्नांचा सर्वंकष विचार करून त्यांना विविध शासकीय योजनांचा प्रभावी लाभ मिळावा यासाठी एकल महिला धोरण आणले जाणार आहे. त्यासाठी मसुदा समिती गठीत करण्यात आल्याची माहिती महिला आणि बाल विकास राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी शनिवारी दिली. त्या म्हणाल्या, राज्यातील विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित, अविवाहित तसेच एकट्याने संसाराचा भार सांभाळणाऱ्या महिलांच्या समस्या शासन स्तरावर प्रभावीपणे मांडून त्यांच्यासाठी स्वतंत्र धोरणाची आवश्यकता होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पीय भाषणात केलेल्या घोषणेनुसार ही मसुदा समिती गठीत करण्यात आली आहे.

# खरीप हंगामासाठी विभागीय भरारी पथकाची स्थापना

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) –** खरीप हंगाम २०२६-२७ मध्ये शेतकऱ्यांना दर्जेदार कृषि निविष्ठा वेळेत आणि योग्य दरात उपलब्ध व्हाव्यात यासाठी कृषि विभाग यांच्या वतीने विभागीय स्तरावर भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे.

छत्रपती संभाजीनगर विभागातील कृषि निविष्ठांचे वितरण, तपासणी आणि सनियंत्रण अधिक प्रभावीपणे करण्यासाठी जिल्हानिहाय पथके नियुक्त करण्यात आली आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासाठी ए.एल. काळुशे, तंत्र अधिकारी (गुणनियंत्रण) यांची पथक प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली असून पी.ए. ताजणे, मोहिम अधिकारी जिल्हा परिषद, एच.एस. कातोरे, जिल्हा गुण नियंत्रण निरीक्षक आणि एस.जी. बंडगर, विभागीय गुणनियंत्रण निरीक्षक यांची सदस्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

जालना जिल्ह्यासाठी ए.एल. काळुशे यांची पथक प्रमुख, एन.डी. भदाणे आणि एम.के. काटे यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तर बीड जिल्ह्यासाठी ए.एल. काळुशे यांच्या नेतृत्वाखाली एस.जी. गरांडे आणि व्ही.पी. भोसले यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सर्व पथकांसाठी एस.जी. बंडगर हे सदस्य सचिव म्हणून काम पाहणार आहेत.

संपूर्ण विभागात चांगल्या प्रतीच्या कृषि निविष्ठांचे व्यवस्थित वितरण होण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी प्रभावी नियोजन करावे, तसेच शेतकऱ्यांची कोणतीही अडवणूक होणार नाही याची दक्षता घ्यावी, अशा सूचना विभागीय कृषि सहसंचालक सुनिल वानखेडे यांनी दिल्या आहेत.

कृषि निविष्ठांच्या विक्रीमध्ये गैरव्यवहार, साठेबाजी किंवा जादा दराने विक्री आढळल्यास संबंधित उत्पादक अथवा विक्रेत्यांचे परवाने निलंबित अथवा रद्द करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येणार असून गंभीर प्रकरणांमध्ये फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशाराही कृषि विभागाने दिला आहे.

# शिर्डीत होणार अत्याधुनिक शस्त्रनिर्मिती – संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी केले उद्घाटन



**शिर्डी (प्रतिनिधी) –** शिर्डीच्या औद्योगिक वसाहतीत उभारण्यात आलेल्या निबे ग्रुपच्या संरक्षण उत्पादन प्रकल्पाचे उदघाटन आज देशाचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते संपन्न झाले. या उद्घाटन सोहळ्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटलांसह अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावली. अहिल्यानगर जिल्ह्यात प्रथमच सुरू होत असलेल्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पात वर्षाला तब्बल पाच लाख तोफगोळे तयार करण्याची क्षमता आहे. राजनाथ सिंह यांनी प्रकल्पाची पाहणी करत या डिफेन्स क्लस्टरचे उद्घाटन केले.

शिर्डीतील हा डिफेन्स क्लस्टर मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारताचे स्वप्न साकार करणारा आहे. या प्रकल्पातील उत्पादन तंत्रज्ञान आणि कच्चा माल स्वदेशी आहे. अवघ्या एका वर्षात उभारण्यात आलेल्या या प्रकल्पामुळे शिर्डी परिसरात संरक्षण उद्योगाचे मोठे जाळे निर्माण होण्यास सुरुवात झाली आहे. शिर्डीत आता भक्ती सोबत देशाच्या संरक्षण शक्तीचाही प्रत्यय येणार आहे. सुमारे दोनशे एकर परिसरात रॉकेट लाँचर, लांब पल्ल्याच्या रॉकेटचे सुटे भाग, स्वयंचलित ड्रोन तसेच विविध इलेक्ट्रॉनिक यंत्रणांच्या चाचणी सुविधा विकसित केल्या जात आहेत.


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

The Superintending Engineer, MSEDCL, Nanded circle , Nanded on behalf of MSEDCL (The Employer) invites sealed tenders from reputed and e-registered agencies/bidders for " Hiring of Vehicle " for Nanded circle The details are given below :

| Sr. No. | Tender No. | Tender Estimate Cost | Work Area | Tender purchasing Cost (including GST) | EMD in Rupees |
|---|---|---|---|---|---|
| 1 | SE/NDC/E-TEN/2026-27 /T-02 | 2934000 | Nanded Circle | 1180 | 29340 |
| 2 | SE/NDC/E-TEN/2026-27 /T-03 | 2286000 | Nanded Circle | 1180 | 22860 |
| 3 | SE/NDC/E-TEN/2026-27 /T-04 | 3171600 | Nanded Circle | 1180 | 31716 |
| 4 | SE/NDC/E-TEN/2026-27 /T-05 | 2406000 | Nanded zone | 1180 | 24060 |
| 5 | SE/NDC/E-TEN/2026-27 /T-06 | 2788800 | Nanded Zone | 1180 | 27888 |

The tenders will be processed only in electronic tendering mode and opened for registered agencies on e-Tendering system for works contact of MSEDCL. The Bid documents will be available from 23.05.2026 to 28.05.2026 up 15:00 hrs. The last date for uploading of e-Tenders is 28.05.2026 up to 16:00 hrs. Pre-bid meeting will be held on dt.25.05.2026 at 12:00 hrs. For more details regarding registration process and tender visit our Company's e-Tendering website https://www.mahadiscom.in.
The undersigned reserves all the rights to accept or reject any or all tenders without assigning any reasons thereof. Contact Details: Superintending Engineer – **MB no-7558369444**

**(No. PR0/NZ/27/2026-27)** **SD /- Superintending Engineer (NDC)**

रामबाण ईलाज
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# मनपाची नमस्कार चौक परिसरातील अतिक्रमण हटाव मोहीम सलग दुसऱ्या दिवशीही सुरू



**नांदेड (प्रतिनिधी)**– महानगरपालिकेकडून शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून नमस्कार चौक ते एमजीएम कॉलेज या वर्दळीच्या रस्त्यावरील अनधिकृत अतिक्रमणांवर सलग दुसऱ्या दिवशी मोठी धडक कारवाई करण्यात आली आहे.

या कारवाई दरम्यान उजवी बाजू नमस्कार चौक ते रेणापूरकर बिल्डिंगपर्यंतचे अतिक्रमण काढण्यात आले. या मोहिमेत नमस्कार चौक ते एमजीएम कॉलेज परिसर रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असलेले अनधिकृत ओटे, शेड, केबिन्स आणि फलक हटवण्यात आले. या कारवाईत महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन पथकामार्फत जेसीबी यंत्रणा आणि ट्रकचा वापर करण्यात आला. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून स्थानिक पोलिसांचा मोठा ताफा तैनात करण्यात आला होता.

ही कारवाई मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार व अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली उपआयुक्त अजितपालसिंघ संधू यांच्या नेतृत्वात कार्यकारी अभियंता दिलीप टाकळीकर, अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण विभाग व पोलीस प्रशासनाच्या संयुक्त पथकाने केली.

नांदेड शहरात गेल्या काही दिवसांपासून वाहतुकीचा प्रश्न गंभीर झाला आहे. विशेषतः नमस्कार चौक ते एमजीएम कॉलेज हा रस्ता शैक्षणिक संस्था आणि रुग्णालयांकडे जाणारा मुख्य मार्ग असल्याने येथे मोठ्या प्रमाणात गर्दी असते. दुसऱ्या दिवसाची मोहीम ही पहिल्या दिवसाच्या कारवाईनंतर उरलेली अतिक्रमणे आणि काही दुकानदारांनी पुन्हा लावलेले साहित्य दुसऱ्या दिवशी धडक मोहीम राबवून जप्त करण्यात आले. महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, रस्त्यावर पुन्हा अतिक्रमण केल्यास संबंधित व्यक्तीवर दंडात्मक कारवाई करून गुन्हा दाखल केला जाईल. या कारवाईमुळे रस्ता रुंद झाला असल्याने वाहनधारकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# मुंबईत सापडला नांदेडचा बेपत्ता डॉक्टर तरुण; भिकाऱ्यांचे पुनर्वसन मोहिमेमुळे कुटुंब आनंदले!



**नांदेड (प्रतिनिधी)**–शहरात भिकाऱ्यांचे पुनर्वसन करण्यासाठी 'कायापालट' ही लोकचळवळ मागील काही दिवसांपासून सुरू केली. अशाच पद्धतीची मुंबई पोलिसांनी भिकाऱ्यांचे पुनर्वसन करण्यासाठी एक मोहीम हाती घेतली आणि या मोहिमेत हदगाव तालुक्यातील तामसा येथील वैद्यकीय शिक्षण घेणारा अभय बेळकोणे त्यांना मिळाला. त्याची विचारपूस केल्यानंतर तो घरातून मानसिक आजाराच्या धक्क्याने कुणाला काही न सांगता एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात निघून गेला. मात्र मुंबई मालाड पोलिसांच्या सतर्कतेमुळे तो परत आपल्या कुटुंबात सामील झाला. कुटुंबाने मुंबई पोलिसांचे आभार मानले.

हदगाव तालुक्यातील वायफना येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक सुरेश बेळकोणे यांचा मुलगा अभय हा डीएचएमएस (होमिओपॅथिक) जळगाव येथे वैद्यकीय शिक्षण घेत होता. तो मागील काही दिवसांपासून मानसिक आजाराने त्रस्त होता. त्याच्यावर मानसोपचार तज्ज्ञांकडे उपचार सुरू आहेत. परंतु अचानक २ एप्रिल रोजी घरातून कुणाला काही न सांगता निघून गेला. तो थेट तिरुपती– कन्याकुमारी परत नांदेड आणि पुढे मुंबई असा रेल्वेने फिरत मुंबईत आला.

या दरम्यान त्याची बॅग, मोबाईल चोरीला गेली. त्यामुळे त्याचा घरच्या लोकांशी संपर्क होऊ शकला नाही. अंगावर मळकट कपडे, अनवाणी फिरत भीक मागत तो कसाबसा जगू लागला. यातच मालाड पोलिसांच्या एका पथकाला भिकाऱ्यांचे पुनर्वसन मोहिमेत तो सापडला. त्याला ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणून स्नान, जेवण दिल्यानंतर विचारपूस केली असता तो तामसा ता. हदगाव (नांदेड) येथील असल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले. इकडे तामसा पोलीस ठाण्यात तो हरवल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती. मालाड पोलिसांनी तामसा पोलिसांशी संपर्क साधून त्याच्या पालकाला मुंबई येथे बोलावून घेऊन स्वाधीन केले आहे. विशेष म्हणजे अभय बेळकोणे याचा एक मोठा भाऊ छत्रपती संभाजीनगर येथे वैद्यकीय शिक्षण घेत आहे. दीड महिन्यानंतर आपला मुलगा पोलिसांच्या तत्परतेमुळे मिळाल्याबद्दल त्यांनी मुंबई पोलिसांचे आभार मानले.

पडताळणीसाठी पोलिसांनी तामसा पोलिसांशी त्वरित फोटोंची देवाणघेवाण केल्यानंतर अभयचे कुटुंब तातडीने मुंबईला रवाना झाले. रात्री ११ वाजता हे कुटुंब मालाड पोलीस ठाण्यात दाखल झाले आणि शोधाशोध करण्यासाठी गेलेल्या त्या वेदनादायी आठवणींचा अखेर अंत झाला. आपल्या मुलावर नजर पडताच अभयच्या वडिलांना अश्रू अनावर झाले.

या प्रकरणी मालाड पोलिसांनी अभयच्या वडिलांशी फोनवरून संपर्क साधला. अभय नांदेड येथे मनोरुग्णालयात उपचार घेत होता. साधारण दीड महिन्यापूर्वी, कोणालाही काहीही न सांगता तो घरातून निघून गेला होता. त्यामुळे त्याच्या कुटुंबियांनी त्याचा शोध घेण्यासाठी एकच धावपळ सुरू केली होती. अखेर त्यांचा घरातून निघून गेलेला मुलगा मिळाल्याने बेळकोणे कुटुंब आनंदात न्हावून निघाले.

## शेतकऱ्यांची ५३ लाखांची फसवणूक; गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)** –लोहा तालुक्यातील शेलगाव (धानोरा) येथील शेतकऱ्याला सहा हेक्टर पाच आर जमीन इस्कॉन टेम्पल मॅनेजमेंट कंपनीला विक्री करून देतो असे आमिष दाखवून त्या शेतकऱ्याकडून नगदी व ऑनलाईन असे ५२ लाख ९२ हजार रुपये घेऊन फसवणूक केली. हा प्रकार २७ ऑगस्ट २४ ते ५ एप्रिल २५ च्या दरम्यान घडला.

नांदेड शहराच्या सराफा बाजार भागात राहणारे सुरेश गणेशराव रुद्रकंठवार व त्यांच्या काही मित्रांची लोहा तालुक्यातील शेलगाव (धानोरा) शिवारात शेती आहे. सदरच्या शेतीपैकी सहा हेक्टर पाच आर जमीन इस्कॉन टेम्पल मॅनेजमेंट कंपनीला विक्री करून देतो. त्यामुळे तुमचा खूप मोठा फायदा होईल असे आमिष वर्कशॉप परिसरात राहणारा प्रकाश केशव केंद्रे यांनी पीडित सुरेश रुद्रकंठवार व त्याच्या नातेवाईकांना दाखविले. विश्वास पटल्याने सुरेश रुद्रकंठवार व त्यांच्या इतर नातेवाईकांनी वेगवेगळ्या ठिकाणी ५२ लाख ९२ हजार रुपये प्रकाश केंद्रे यांना दिले. एवढेच नाही तर सुरेश रुद्रकंठवार यांच्यासह मूळ शेतमालकाकडून वेगवेगळे शपथ पत्र लिहून घेऊन फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार २७ ऑगस्ट २०२४ ते ५ एप्रिल २०२५ या कालावधीत घडला.

मात्र जमीन व्यवहार पूर्ण न करता आरोपी प्रकाश केंद्रे यांनी पीडित व साक्षीदारांची फसवणूक केल्याची तक्रार सुरेश गणेशराव रुद्रकंठवार यांनी दिली आहे. या तक्रारीवरून सोनखेड पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४) तसेच बीएनएस–२०२३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक कांबळे करत आहेत.

# काळ्या फिल्म आणि फॅन्सी नंबरप्लेट वाहनांवर वाहतूक शाखेची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहराच्या मुख्य रस्त्यावरून वाहतूक नियम मोडीत काढत गर्भ श्रीमंत समजणाऱ्या व थार मधून मिरविणाऱ्यांसोबतच फॅन्सी नंबर प्लेट लावून आपण इतरांपेक्षा काही वेगळे आहोत असे दाखविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना शहर वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे व त्यांच्या टीमने चांगलेच वठणीवर आणले. शहरात शनिवारी अशा वाहनांची धरपकड मोहीम हाती घेऊन जवळपास आठ पेक्षा अधिक थार आणि फॅन्सी नंबर प्लेट लावलेल्या वाहनांविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईमुळे अनेक काळ्या फिल्म लावणाऱ्या गाड्या रस्त्यावरुन अचानक गायब झाल्या.

शहरामध्ये बेशिस्त वाहतुकीला शिस्त लावण्याचा शहर वाहतूक शाखेकडून प्रयत्न सुरू आहे. शहरांच्या रस्त्याची काहीअंशी रुंदी वाढविल्याने वाहतूक कोंडीतून नांदेडकरांची सुटका झाली, मात्र वाहतूक नियम मोडीत काढत काही वाहनधारक आपल्या वाहनांच्या नंबर प्लेट, सायलेन्सर मध्ये किंवा ग्लासमध्ये बदल करून आपण काही वेगळे आहोत अशा अविर्भावात हे आपली वाहने चालवतात. यात विशेष म्हणजे शहरातील काही



श्रीमंतांचे दिवटे यांच्या वाहनांचाही समावेश आहे. शहरातून धावणाऱ्या चार चाकी वाहनांना काळ्या फिल्म लावल्या तसेच फॅन्सी नंबर प्लेट लावल्याने एखादा गुन्हा करून जर हे वाहन भरधाव वेगात घटनास्थळावरून निघून गेले तर त्या वाहनाची ओळख पटविणे पोलिसांना अवघड होत आहे. वाहनांमध्ये बसलेले कोण आहेत? याची ओळख पटत नसल्याने अनेक गुन्हेगारसुद्धा अशा वाहनांचा वापर गुन्हे करण्यासाठी करतात हे मागील काही घटनांवरून उघड झाले आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार आणि अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली शहर वाहतूक शाखा वजिराबादचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे व त्यांच्या सहकाऱ्यांनी शनिवारी अचानक अशा वाहनांविरुद्ध कारवाई करण्याची मोहीम हाती घेतली. शहराच्या वेगवेगळ्या रस्त्यावर त्यांनी काळ्या फिल्म लावून आलेल्या थार, स्कार्पिओ व अन्य चारचाकी वाहनांची तपासणी केली. अशा वाहनांवरती जागेवरच काळ्या फिल्म काढण्यास भाग पाडले. उलट त्यांच्याविरुद्ध दंडात्मक कारवाही करण्यात आली. यासोबतच फॅन्सी नंबर प्लेट लावणाऱ्या वाहनांनाही दंड आकारण्यात आला आणि त्यांच्या नंबर प्लेट जप्त करण्यात आल्या असून त्यांना समज दिली आहे. यापुढेही ही मोहीम अशीच चालू राहणार असून काळ्या फिल्म किंवा फॅन्सी नंबर प्लेट लावणाऱ्या वाहनधारकांनी आपल्या गाड्यांच्या काही भागांमध्ये बदल करून परिवहन कायद्याचे उल्लंघन करू नये अन्यथा आपल्या वाहनाविरुद्ध मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल असे आवाहन सहाय्यक पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे यांनी केले आहे.

## शिवाजीनगरमध्ये मटका बुक्कीवर तर कुंटूर हद्दीत जुगार अड्ड्यावर धाड

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहराच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गोकुळनगर रस्त्यावर मटका बुक्कीवर तर कुंटूर पोलिसांनी हिप्परगा (जा) येथे जुगार अड्ड्यावर कारवाई करून रोख रकमेसह जुगाऱ्यांना अटक केली आहे.

शहराच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गोकुळनगर भागात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस हवालदार राजकुमार डोंगरे व त्यांचे सहकारी गस्तीवर असताना अतुल राजू ढगे, सुमित सत्यजित जाधव, शेख जमीर आणि शेख अब्बास हे विनापरवाना बेकायदेशीररित्या कल्याण ओपन नावाचा मटका जुगार खेळवत होते. त्यांना पोलिसांनी ताब्यात घेऊन त्यांच्याकडून रोख २६ हजार ९३० रुपये आणि जुगाराचे साहित्य जप्त केले. पोलीस हवालदार राजकुमार डोंगरे यांच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तर दुसऱ्या कारवाईत नायगाव तालुक्यातील हिप्परगा (जा) येथे सुरू असलेल्या एका जुगार अड्ड्यावर कुंटूर पोलिसांनी कारवाई केली. ही कारवाई २२ मे रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास केल्यानंतर जुगार अड्ड्यावरून मधुकर आनंदा कदम, रामदास घडलींग कदम, महादेव रमेश गायकवाड, संभाजी शिवराम पवार, नामदेव खंडू गारोळे आणि वेंकटी गंगाराम कदम सर्व राहणार हिप्परगा (जा) यांना अटक केली. त्यांच्याकडून जुगाराचे साहित्य व नगदी ६६०० रुपये जप्त केले.

## देशमुखवाडीतील चक्रीवादळग्रस्तांना मदत करण्याची मागणी

**अर्धापूर (प्रतिनिधी)** –तालुक्यातील देशमुखवाडी येथील चक्रीवादळाच्या तडाख्याने घरावरील पत्रे उडून, विजेचे खांब घरावर तुटून पडली आहेत. या चक्रीवादळात अनेकजण जखमी झाले आहेत. नुकसान झालेल्यांना शासनाने त्वरित मदत द्यावी, अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख बबनराव बारसे यांनी आपत्कालीन मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

देशमुखवाडी येथे चक्रीवादळात घरावरील पत्रे उडून, पत्र्यावरील दगड कोसळून अनेकजण जखमी झाले. तसेच विद्युत पोल तुटून घरावर पडल्याने घराचे नुकसान झाले आहे. अनेक जनावरेसुद्धा जखमी झाली आहेत.

या नुकसानीची पाहणी करताना शिवसेना जिल्हाप्रमुख बबनराव बारसे, सभापती दिलीपराव



देबगुंडे, सरपंच गिरजाराव नरोटे, गणपत सोळंके, गोविंदराव भरकड, कुचरू पाटील, पिंटु तळन, शेख गफार यांनी चक्रीवादळामुळे नुकसान झालेल्या लक्ष्मण डुकरे, जाबवंत खंदारे, साहेबराव देशमुखे यांच्या घरी भेट देऊन झालेल्या नुकसानीची पाहणी करून लवकर मदत मिळावी, अशी मागणी बबनराव बारसे यांनी केली आहे.

यावेळी गावकरी कोंडीबा देशमुखे, भागोराव देशमुखे, दशरथ डवळे यांच्यासह गावकरी मंडळी उपस्थित होते.

## 'स्वारातीम' विद्यापीठातील डॉ. पृथ्वीराज तौर यांना फ्रेंड्स ऑफ नवासा पुरस्कार प्रदान

**नांदेड (प्रतिनिधी)** –दक्षिण आफ्रिकेची राष्ट्रीय लेखक संघटनेच्यावतीने संघटनेच्या संविधानानुसार आयोजित गेलेल्या महासभेमध्ये साहित्य क्षेत्रात कार्यरत मान्यवरांचा प्रमुख पाच श्रेणीमध्ये विविध पुरस्कार देऊन शनिवार, दि. २३ मे रोजी गौरव करण्यात आला. महासभेला दक्षिण आफ्रिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष कगालेमा मोटलांथे यांची उपस्थिती होती.

जीवन गौरव पुरस्कारासोबतच ग्रँड पॅटर्न ऑफ द आर्ट्स अवार्ड, फ्रेंड्स ऑफ नवासा पुरस्कार, रायझिंग स्टार व प्रेसिडेंटस् अवार्ड हे नॅशनल असोसिएशन ऑफ साऊथ आफ्रिकाच्या वतीने प्रत्येक तीन वर्षांनी देण्यात येणारे पुरस्कार महासभेत प्रदान करण्यात आले.

दक्षिण आफ्रिकेतील मराठी साहित्याचा भाषांतराच्या माध्यमातून प्रसार व संवर्धन केल्याबद्दल व आंतरराष्ट्रीय ऐक्याला बळ दिल्याबद्दल स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुलाचे संचालक डॉ. पृथ्वीराज तौर यांना 'फ्रेंड्स ऑफ नवासा' हा पुरस्कार देऊन महासभेत सन्मानित करण्यात आले.




मानपत्र आणि स्वविशिष्ट पदक असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. सुवर्ण झळाळी असणाऱ्या पदकावर आफ्रीका खंडाचा नकाशा व पॅन आफ्रिकन रिबन आहे. डॉ. तौर यांनी दृकश्राव्य उपस्थितीद्वारे हा सन्मान स्वीकारला. डॉ पृथ्वीराज तौर यांच्यासमवेत जिदी माजिया (चिन), दाझरा नोव्हाक (क्युबा), मुराद अल सुदानी (पॅलेस्टाइन), वादिम तेरेखिन (रशिया), मार्कोस फ्रेटास (ब्राझिल), झुकिस्वा वॅनर (दक्षिण अफ्रिका), शॅड चिकोटी (मलावी) या लेखकांनाही 'फ्रेंड्स ऑफ नवासा' हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार मिळवणारे डॉ. तौर हे पहिलेच भारतीय लेखक व भाषांतरकार आहेत. पुरस्कार स्वीकारल्यानंतर केलेल्या भाषणात डॉ. पृथ्वीराज तौर यांनी नेल्सन मंडेला यांना आपला पुरस्कार अर्पण करून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाविषयी कृतज्ञता व्यक्त केली. या सन्मानासाठी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर आणि अन्य अधिकारी यांनी डॉ. पृथ्वीराज तौर यांचे अभिनंदन केले.

# आंतरराज्यीय सराईत गुन्हेगार अटकेत; १२ गुन्हे उघड, ४ लाख ७६ हजारांचा मुद्देमाल जप्त

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड ग्रामीण गुन्हे शोध पथकाने आंतरराज्यीय सराईत गुन्हेगारास जेरबंद करुन चोरीचे एकूण १२ गुन्हे उघड केले. या घटनेतील ४ लाख ७६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या सराईत गुन्हेगारांकडून अनेक गुन्हे उघडकीस आले आहेत.

पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत मालो गुन्हे उघडकीस आणण्याचे सर्व पो.स्टे.चे प्रभारी अधिकारी यांना आदेशित केले होते. त्या अनुषंगाने ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शोथ पथकाचे पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मटवाड व पथकातील अंमलदार हे पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण हद्दीत पेट्रोलींग करीत असताना त्यांना



गोपनीय माहीती मिळाली की, पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण हद्दीत, नांदेड शहर व तेलंगणा राज्यात मोटारसायकल चोरी, मोबाईल चोरी करणारे तीन आरोपी हे गाडेगाव रोडवर चोरीचे मोबाईल विक्रीकरिता संशयीतरित्या थांबले आहेत, अशी माहिती मिळाली.

या माहितीवरून पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी त्यांना ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी त्यांची नावे सय्यद अराफत सय्यद हुसेन वय २६ वर्ष व्यवसाय मजुरी रा. मलंगवावा बिल्डींग जवळ नांदेड, शेख अरबाज शेख अजीज वय २५ वर्षे व्यवसाय मजुरी रा. हताई नई मस्जीद जवळ नांदेड व एक विधीसंघर्ष बालक असे सांगितले.

आरोपींच्या ताब्यातून चोरीच्या दोन मोटारसायकल जप्त करण्यात आल्या. त्यांनी नमूद मोटारसायकल सिडको मनपा क्षेत्रीय कार्यालयाजवळून व तेलंगणा राज्यातील निझामाबाद येथून चोरी केल्याचे सांगितले. त्या अनुषंगाने पोलीस स्टेशन येथील अभिलेखाची पाहणी केली त्यांच्याविरुद्ध पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण व निझामाबाद येथे गुन्हे दाखल असल्याचे दिसून आले. तसेच त्यांचे जवळ असलेल्या बॅगची पाहणी केली असता त्यात एकूण चोरीचे १० मोबाईल मिळून आले. आरोपींनी संगनमत करुन नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीतील भगवानबाबा चौकात मोबाईल चोरल्याचे सांगितले. या प्रकरणी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अवैध शस्त्रसाठ्यावर पोलिसांची टाच; १४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहर आणि जिल्ह्यातील गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी नांदेड पोलिसांनी आता धाडसी पावले उचलली आहेत. एकापाठोपाठ एक शस्त्रविरोधी मोहिमा राबवून मोठ्या प्रमाणात घातक शस्त्र जप्त करण्यात येत आहेत. अशाच एका कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेने एकाच्या ताब्यातून शुक्रवार, दि. २२ मे रोजी रात्री तब्बल ७०३ अवैध शस्त्रे जप्त केली आहेत. या कारवाईत १४ लाख ४ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. मात्र पोलीस दिसताच शस्त्र बाळगणारा पसार झाला.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सुरू केलेल्या क्रॅकडाऊन अभियानांतर्गत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांनी आपल्या सर्व सहकाऱ्यांना सूचना देऊन अवैध शस्त्र विक्री, घरफोडी, जुगार अड्डा, चोरी



यासोबतच अवैध धंद्यांविरुद्ध कारवाई करण्याचे आदेश दिले. पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे व त्यांच्या टीमने गुरुद्वारा चौकातील देना बँक चौक ते सचखंड गुरुद्वारा जाणाऱ्या रस्त्यावरील ३०० सालाना शॉपिंग प्लाझा येथील रणजीतसिंग सरदार यांच्या दुकान क्रमांक आठमध्ये अवैधरित्या शस्त्रांची विक्री होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार पो. नि. अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली मिलिंद सोनकांबळे यांच्या पथकाने छापा टाकला. या कारवाईदरम्यान रणजितसिंह रामसिंह सरदार (रा. नंदीग्राम सोसायटी, नांदेड) याच्या दुकानातून बारा लाख ३१ हजार रुपये किमतीच्या ४७० तलवारी, एक लाख ७० हजार ९०० रुपये किमतीचे २०९ खंजर/चाकू आणि २४०० रुपये किमतीचे २४ फायटर/पंच असा एकूण १४ लाख ४ हजार ३०० रुपयांचा अवैध शस्त्रसाठा जप्त करण्यात आला.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com